प्रकरण १ Chapter-1

# मराठी कादंबरीचा इतिहास

(थोडक्यात)

प्रकरण १:

# मराठी कादंबरीचा इतिहास
(थोडक्यात)

अ) इ.स. १८५७ ते १८८५ या काळातील कादंब-या :

आ) इ.स. १८८६ ते १९४० या काळातील कादंब-या :

इ) इ.स. १९४१ ते १९६० या काळातील कादंब-या :

ई) इ.स. १९६१ ते १९८५ या काळातील कादंब-या :
विशेषत: दलित व ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात

# प्रकरण १: मराठी कादंबरीचा इतिहास (थोडक्यात)

'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार इंग्रजी संस्कृतीच्या संपर्कातून आपल्याकडे आला असला तरी, वस्तुत: कथात्मक गद्याची परंपरा आपल्याकडे होती. हे ही लक्षात घेतले पाहिजे. इंग्रजी संस्कृतीच्या संपर्काने आपल्या लोकांना मात्र या प्रकाराची अधिक जाण झाली. कादंबरी या वाङ्मय प्रकाराबद्दल कुसुमावती देशपांडे लिहितात,"पार्थिव संसारा विषयीची आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्‌भुताचा मार्ग धरून मूलत: मानवी प्रश्नांचा विचार करणे. हा कादंबरीचा दृष्टिकोण. जीवन विषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टिकोण, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्ति चित्राच्या व एक विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती." (१) तर बालशंकर देशपांडे यांच्या मते, "वाचकांना मानवी जीवनाबद्दल विशेष कुतूहल वाटत असते. मनुष्याचे व्यवहार, त्याच्या वाट्याला येणारी सुखदु:खे, हे सर्व जाणून घ्यायला तो नेहमीच उत्सुक असतो. त्याला जे हवे असते. ते सर्व, कादंबरीच्या रूपाने अनुभवायला मिळते." (२) कादंबरीतून माणसाला स्वत:च्या आवडी निवडीचे अनुभवाचे प्रतिबिंब पहावयास मिळते. म्हणूनच कादंबरी हा वाङ्मय प्रकार वाचकांना अधिक जवळचा, विशेष आत्मीयता असलेला वाटतो. तेथे "अनेक व्यक्ती, अनेक प्रसंग, घटना, विविध कुटूंब, अशा कुटूंबांनी बनलेला समाज, त्याला मूल्य संकल्पनांनी व्यक्तींच्या जीवनाची होणारी उलथापालथ, विविध समस्यांनी ग्रासलेले एकंदरीत मनुष्यजीवन, निरनिराळ्या जाती-जमाती, जगण्याच्या नाना रीती प्रदेश हे सगळे कादंबरीत आढळते." (३) असे वसंत आबाजी डहाके यांना वाटते. या विविध मतावरून कादंबरीच्या विस्तृत अवकाशाची कल्पना स्पष्ट होते. आधुनिक काळात कादंबरीची अधिक प्रभावी व विस्तृत

मांडणी भालचंद्र नेमाडे यांनी केलेली आहे. नेमाडे यांच्या मते," कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्र, प्रसंग - अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत, अशी साहित्यकृती असते." (४)

कादंबरी हा गद्याचा निर्मितीशील असा एक प्रकार असून या गद्यनिर्मितीच्या मागे अनेक महत्त्वाच्या प्रेरणा आहेत. इंग्रजांच्या आगमना नंतर आपल्या साहित्यात अनेक नवीन वाङ्मय प्रकार आले. त्यात कादंबरी हा प्रकार आला आणि विस्तारला. इंग्रजी संस्कृतीमुळे आपल्या साहित्यात नवीन वाङ्मयीन जाणीवा, मानवी जीवन व समाज यांच्याकडे पाहण्याची एक नवीन मूल्य दृष्टी या निर्माण झाल्या. या जाणीवा, नवीन मूल्यदृष्टी निर्माण होण्याला कारण इंग्रजी संस्कृतीचा प्रभाव होता. या नवीन संस्कृतीच्या आगमनानेच आपल्या समाजात एक नवीन परिस्थिती निर्माण होऊन कादंबरीसारखा साहित्य प्रकार येथे दृढ होऊन लोकप्रिय होण्यास ती परिस्थिती अनुकूल झाली. या बद्दल श्री चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, "महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार झाला. १८५७ मध्ये मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना झाली. मोठ्या शहरांतून कॉलेजची संख्या वाढू लागली. स्त्रियांचे शिक्षण सुरू झाले. वाढले. पाश्चात्य साहित्याचे आगमन झाले. त्यातील स्त्री पुरूष संबंधातील मोकळेपणा इथल्या तरूणांना विशेषत्वाने जाणवला, भावला. शाळा, कॉलेज यांत शिक्षक वर्ग वाढला. सरकारी नोकरदारांचा वर्ग निर्माण झाला. आणि बहुसंख्य शिक्षित वर्ग या नोकरपेशा वर्गात सामावला गेला. आर्थिक मंदी (१९३२) जाणवे पर्यंत एकंदरीत हा शिक्षकवर्ग, नोकरपेशा वर्ग एक पांढरेपशाचे सुखमय जीवन जगू शकत होता. गरजा फारशा वाढल्या नव्हत्या. त्यामुळे महर्गतेची व आर्थिक टंचाईची भयानक झळ बसेल इतके जीवन कठीण नव्हते. अर्थातच पांढरपेशा संस्कृती निर्माण झाली. वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात वैवाहिक असमानता जाणवू लागली होती. कारण स्त्री-पुरूषांच्या संबंधात मुक्तपणा नव्हता. संस्कृत साहित्याच्या परंपरेत वाढलेल्या मध्यमवर्गावर सुद्धा रसराज शृंगाराचे संस्कार होते. अद्भुत रमणीय साहित्यातही त्याची कमतरता नव्हती. मात्र

आपल्या ऐहिक जीवनातही हा प्रणय अनुभविण्याची शक्यता आहे, याची अंधुक जाणीव होऊ लागली होती. प्रत्यक्षात धार्मिक व सामाजिक रूढींची अनेक दडपणे होती. यातूनच 'प्रणया' संबंधी एक स्वप्नाळू, भावविवश, इच्छापूर्तीच्या लालसेने बरबटलेली अशी एक दृष्टी मध्यमवर्गीय मनात निर्माण झाली होती. मराठीच्या रंजनवादी कादंबरीकारांनी उघडपणे ही इच्छा पूर्ण केली, तर जीवनवाद्याना ही लेखनाचा हिशोब जमविण्यासाठी प्रणयचित्रांचा समावेश करावा लागला." (५) तसेच इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराने नवसुशिक्षितांच्या नव्या सुधारणा विषयक विचारांची प्रवृत्ती वाढीस लागली. समाजातील अनिष्ट रूढी, परंपराचा विरोध होऊ लागला. हे सुधारकी विचार, प्रवृत्ती विवेक माध्यमातून व्यक्त झाले. वृत्तपत्रे, विविध संस्था, मंडळे यांच्याद्वारे ही प्रवृत्ती व्यक्त झाली. तेथे राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनाने मुद्रण-प्रसाराच्या प्रसाराने कादंबरी ह्या साहित्य प्रकाराच्या निर्मितीला अधिक वेग मिळाला.

सुरवातीच्या काळात संस्कृत प्राकृतच्या परंपरेतील परिकथा, अद्‌भुतकथा मराठी साहित्यात लिहिल्या गेल्या. 'सिंहासन बत्तिशी', 'हितोपदेश', 'पंचतंत्र' सारख्या गोष्टीरूप ग्रंथांची भाषांतरे झाली, त्यामुळे विविध स्वरूपाचे कथा- वाङ्‌मय मिशनरी आणि इंग्रज सरकार यांच्या प्रेरणेने मराठीमध्ये आले. या बोध देणा-या कथांबरोबरच अद्‌भुताला प्राधान्य देणा-या कथाही प्रसिद्ध झाल्या. या भाषांतरांच्या परंपरेतूनच कादंबरी या वाङ्‌मय प्रकारचा प्रारंभ झाला. हरि केशवजी यांनी बनियनच्या 'पिलीग्रम्स प्रोग्रेस' या ग्रंथाचे भाषांतर 'यात्रिक क्रमण' या नांवाने करून कादंबरी या प्रकाराची सुरवात केली, असे म्हटले जाते.

आता या पुढे कादंबरीचा इतिहास आपण विविध टप्प्यांनी पाहणार आहोत.

## १) इ.स १८५७ ते १८८५ या काळातील कादंब-या:

मराठी कादंबरीच्या प्रारंभीची अवस्था ही भाषांतरीत स्वरुपाची होती, हे आपण पाहिले. त्याला कारण या कालखंडात भाषांतर करण्याची प्रवृत्ती दिसून येते. मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी बाबा पद्‌मनजी यांनी लिहिलेली 'यमुनापर्यटन' (१८५७) ही

असली तरी ती वादग्रस्त ठरली. रानडे, राजवाडे यासारख्या समीक्षकांनी या कृतीचा कादंबरी म्हणून विचार करताना नकारात्मक मते मांडली आहेत. त्याला कारण या कादंबरीमध्ये केला गेलेला ख्रिस्ती मताचा पुरस्कार होता. तरीही 'यमुनापर्यटन' या कादंबरीचे महत्त्व म्हणजे यामध्ये लेखकाने रेखाटलेले विधवांच्या स्थितीचे चित्र. त्याकाळात विधवा स्त्रियांना भोगावे लागणारे दु:ख हे विविध पैलूंव्दारा कादंबरीतून व्यक्त केलेले आहे.

त्यानंतर अद्‌भुतरम्य अशी हळबे यांची 'मुक्तामाला' (१८६१) ही कादंबरी येते. त्यात योगायोग, संकटे, वेशांतरे,शृंगार वर्णने,क्लिष्ट निवेदन इ. यांना प्राधान्य असले तरी क्वचित कुठे कुठे वस्तुस्थितीच्या छाया दिसतात. या परंपरेत हळबे यांनी 'रत्नमाला' ही कादंबरी लिहिली असून अदभुतरम्य कादंबरीचा प्रवाह सुरू झालेला दिसून येतो.अशा अद्‌भुतरम्य कादंबरीत सामाजिक प्रश्न मिसळून टाकण्याचे प्रयत्न ही दिसून येतात. या अशा कादंब-यांची परंपरा निर्माण होण्यामागे वाचकांची आवड ही कारणीभूत होती. या काळात लोकहितवादी, माडगावकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी इ.चे सुधारकी विचार लेखनातून येत होते. ज्यामुळे वैचारिक पातळीवर समाज जागृतीचे कार्य सुरू झालेले दिसून येते. त्यामुळे या काळतील कादंबरीत एकीकडे संस्कृत परंपरेचा धागा दिसून येतो तर दुसरीकडे समाजप्रबोधन व वास्तवतेच्या चिव्रणाच्या प्रेरणा दिसतात. याच काळात रा.भि. गुंजीकर यांनी 'मोचनगड' (१८७१) ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली आणि ऐतिहासिक कादंब-याचा एक नवा प्रवाह मराठी कादंबरीला येऊन मिळाला. या ऐतिहासिक कादंब-या म्हणजे मुक्तामाला वळणाच्या आणि ऐतिहासिक कथानक, गुंफलेल्या असायच्या. 'मुक्तामाला' सारख्या कादंब-यांच्या परंपरेपेक्षा काहीशा भिन्न वळणाच्या कादंब-या 'राजा मदन ' (इ.स. १८६५), 'नारायणराव आणि गोदावरी' (इ.स.१९८४) इ. लिहिल्या गेल्या. 'नारायणराव आणि गोदावरी' (इ.स.१९८४) या कादंबरीत वास्तवदर्शीपणा पैशाच्या हव्यासाने वृद्ध माणसासी आपली मुलीचे लग्न लावणारे आई बाप, भोळसर नवरे इ. व्यक्तिचित्राद्धारे जगाच्या व्यवहारात असणा-या गोष्टींचे चित्रण झालेले आहे.इंग्रजातील

साहित्यपरिचयामुळे या कादंबरीचा शेवट शोकात्म असा असून ती मराठीतील पहिली शोकांत स्वरुपाची कादंबरी आहे. यावरून लक्षात येते की या कालखंडातच मराठी कादंबरीची जडणघडण निरनिराळ्या प्रेरणांनी होऊ लागलेली दिसते.

## २) इ.स.१८८६ ते १९४० या काळातील कादंब-या :

१८७४ ते १९२० या काळात मराठीत भारतीय भाषांमधून तसेय पाश्चात्य भाषांतील कादंब-यांची भाषांतरे झाली. या काळात श्री वि.सी.गुर्जर यांनी प्रभातकुमार मुकर्जी या बंगाली लेखकाच्या कादंब-या मराठीत भाषांतरीत केल्या.त्यांच्या 'देवता' , 'शशांक' , 'जीवनसंध्या', 'असार संसार' वगैरे कादंब-या प्रसिध्द आहेत. तसेच वा.गो.आपटे, का.र.मित्र,रणदिवे, भिसे,ना.कृ.आगाशे इत्यादि लेखकांनीही बंगाली कादंब-यांचे अनुवाद केले आहेत. इंग्रजी कादंब-यांची मराठी रुपांतरे करण्याचे कार्य श्री. कृ.के.गोखले यांनी पुढाकार घेऊन केलेले आहे. मेरी कॉरेलीच्या 'ट्रेझर्स ऑफ हेवन',जेन ऑस्टेनच्या 'प्राइड अँड प्रेजुडीस' ची त्यांनी केलेली अनुक्रमे 'स्वर्गीय प्रेम' आणि 'आजपासून पन्नास वर्षांनी' ही रुपांतरे आहेत.

मराठी कादंबरी लेखनाच्या तीन दशकानंतर मराठी ग्रामीण कादंबरी लिहिली गेली. मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ 'बळीबा पाटील' (१८८७) या कृष्णराव भालेकर यांच्या कादंबरीमुळे झाला. ग्रामीण साहित्यात आवश्यक असलेल्या सर्व बाबी या कादंबरीमध्ये असूनही केवळ तंत्रदृष्ट्या योग्य नाही या कारणामुळे ग्रामीण साहित्याचे समीक्षक आनंद यादव या कादंबरीला पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून नाकारतात. त्यानंतर 'पिराजी पाटील' (१९०३) ही टिकेकर 'धनुर्धारी' यांनी लिहिलेली कादंबरी पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते. या कादंब-यांमध्ये दुष्काळाशी संबंधित कथानक आहे. या दोन कादंब-यांनंतर फारशा मराठी ग्रामीण कादंब-या लिहिल्या गेल्या नाही.

या काळात 'मुक्तामाला' सारख्या कादंब-या लिहिल्या जात असल्या तरीही एक असा कादंबरीकारांचा वर्ग ही होता. ज्यांचे आदर्श रेनोल्डस, मेडोज टेलर, स्कॉट इ. लेखकांचे लेखन होते. या कादंबरीकारांना 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराच्या स्वरूपाची

जाणीव नसली तरी त्यांना हे लक्षात आले होते की कादंबरीत संसाराचे प्रतिबिंब उमटायला हवे. तसेच अव्वल इंग्रजी काळानंतर 'प्रबोधनाचा' प्रभाव वाङ्मयाच्यासर्व क्षेत्रात होऊ लागला. समाजाला शिकवण द्यायची, चांगले वळण लावायचे ही वृत्ती दृढ होत गेली. या वाङ्मय प्रकारातून रंजन व बोध हे दोन हेतू व्यक्त होऊ लागले. कादंब-या वस्तुस्थिती निदर्शक असल्या तरी त्यातून त्या लेखकाची जीवनानुभूती जाणवतच नव्हती.या सर्व कादंबरीकारापेक्षा हरिभाऊंचे लेखन सर्व दृष्टीने वेगळे होते. म्हणूनच हरिभाऊंच्या लेखनाचा प्रभाव या कालखंडावर अधिक पडला. हरिभाऊंनी 'मधली स्थिती'(१८८५) या कादंबरीपासून कादंबरीलेखनाला प्रारंभ केला. या काळात लोकहितवादी, म. फुले यांच्या सुधारकी विचारांचा आणि चिपळूणकर, टिळक यांच्या विविध मतमतांतराचा प्रभाव हरिभाऊंवर पडला आणि आपण ज्या समाजात, ज्या वर्गात जगलो त्याचा वेध घ्यायचा या दृष्टिकोनातून लेखन सुरू केले. तसेच रेनोल्डस्, मिल्ल, स्पेन्सर सारख्या पाश्चात्य लेखकांच्या विचारांचा ही परिणाम हरिभाऊंवर झाला होता. हरिभाऊंनी 'गणपतराव' (१९८७-८८) 'पण लक्षात कोण घेतो?' (१८९०-९३), 'मी' (१८९३-९५) 'यशवंतराव खरे' (१८९२-९५), 'भयंकर दिव्य' (१९०१-०३), 'मायेचा बाजार' (१९१०-१२) या कादंब-यातून स्त्री शिक्षण, प्रौढविवाह, विधवा विवाह इ. सुधारणांचा पुरस्कार केलेला आहे. या कादंब-यातून हरिभाऊंना कादंबरीच्या अंगोपांगाची, तिच्या रचनातत्त्वाची किती जाण होती, ती व्यक्त होते. हरिभाऊंनी 'उषःकाल' ही स्वतंत्र ऐतिहासिक कादंबरी लिहून ऐतिहासिक कादंबरी लेखनाला प्रारंभ केला. त्यांच्या ऐतिहासिक कादंब-यामधून 'व्यक्ती' पेक्षा त्या ज्या काळात वावरल्या त्या काळालाच अधिक महत्त्व देऊन पुनरूज्जीवित केलेले दिसून येते.हरिभाऊंनी 'वज्राघात' (१९१३-१५) 'सूर्योदय' (१९०५-०८), 'सूर्यग्रहण' (१९०८-०९), 'गड आला पण सिंह गला' (१९०३), 'मध्यान्ह' (१९०६-०८) 'रूपनगरची राजकन्या' (१९००-०२), 'चंद्रगुप्त' (१९०२-०४) इ. ऐतिहासिक कादंब-या लिहिल्या.

हरिभाऊंच्या कादंबरीलेखनामुळे कादंबरीचा वाचक वर्ग हळूहळू वाढू लागला. या

काळात विविध हेतूने नियतकालिके सुरू झाली. त्यांनी ही वाचकांना कादंबरी या प्रकाराकडे वळविण्याचे प्रयत्न केले. हा वाचक वर्ग,नवशिक्षित, पांढरपेशा मध्यमवर्गीय होता. हरिभाऊंनंतर अनेक कादंबरीकारांनी वाचकांना समाजदर्शन व बोध देण्याच्या उद्देशाने लेखन केले. हरिभाऊंच्या कादंबरीलेखनाच्या प्रेरणाचा मोठा प्रभाव अनेक लेखकांवर पडला ते कादंबरीकार म्हणजे ना.ह. आपटे, नाथमाधव, वि.वा. हडप, ना.वि. कुलकर्णी सहकारी कृष्ण, वि.सी.गुर्जर,काशीबाई कानिटकर, चिं. वि. वैद्य ,श्री.कृ. कोल्हटकर इ. होते. या काळात सामाजिक कादंब-या या मनोरंजनाचे साधन आहेत, तसे समाजावर, विशिष्ट वर्गावर, त्यांच्या आचारविचारांवर हल्ला करण्याचे साधन आहे, अशी धारणा हळू हळू होत गेली.

१९१५पासून कादंबरीलेखन करणा-या वा.म.जोशी यांनी आधुनिक मराठी कादंबरीला नव्या तंत्र विषयक सौंदर्याची जाण करून दिली. वा.म. जोशी यांनी ज्याकाळात कादंब-या लिहिल्या, त्याकाळात वाचकांना तत्त्वचर्चा प्रिय होती. त्याचा वापर त्यांनी त्यांच्या कादंब-यात केलेला आहे. त्यांनी 'रागिणी '(१९१५), 'आश्रमहरिणी'(१९१६), 'नलिनी' (१९१९), 'सुशीलेचा देव' (१९३०), 'इंदू काळे सरला भोळे' (१९३४ ) इ. कादंब-या मधून तात्त्विक व नैतिक मूल्यांना महत्त्व दिलेले दिसून येते. तसेच त्यांच्या कादंबरी लेखनातून लेखनकौशल्याचे विविध प्रयोग ही दिसून येतात. वा.म. जोशी यांचा गौरव 'तात्त्विक कादंबरीचे जनक' म्हणून ही केला जातो.

या काळातील कादंबरीचा विकास मुख्यत्वे हरिभाऊ आणि वा.म. जोशी यांच्या कादंबरी लेखनामुळे झालेला आहे. हरिभाऊनी मराठीत प्रथमच वस्तुस्थितीनिदर्शक स्वरूपाच्या कादंब-या लिहिल्या. तसेच त्याच्या कादंब-याचे वैशिष्ट्य म्हणजे त्या जशा कथानक प्रधान आहेत तशाच व्यक्तिदर्शन प्रधान ही आहेत. हरिभाऊंनी स्त्री जीवनाप्रमाणेच मुलांचे जीवन देखील सामाजिक जीवनाचा, राष्ट्र जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे, हे आपल्या लेखनातून जाणवून दिले आहे. तर वा.म.जोशी यांनी प्रगतीशील सामाजिक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार आपल्या कादंब-यातून केला, त्यांनी आपल्या काही

कादंब-यातून तात्त्विकता कथावस्तूशी एकजीव केलेली दिसून येते. अशाप्रकारे वा.म.जोशी यांनी मराठी कादंबरीत तत्त्ववैभव वाढवून उच्च श्रेणीच्या तत्त्वजिज्ञासू वृत्तीने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण मराठी कादंबरीत प्रथमच आणला. कादंबरी हे एक प्रकारे संसारचित्र आहे. या जाणीवेने संसाराचे चित्र दाखवण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष व्यवहाराचे चित्र वाचकां पुढे उभे केले. त्यासाठी निवेदन तंत्राचा कौशल्याने उपयोग केला. 'सुशीलेचा देव' मध्ये काहीभाग लेखकाच्या निवेदनाचा, काही सुशीलेच्या आत्मवृत्ताचा, काही पत्रव्यवहाराच्या स्वरूपाचा आहे, तर 'इंदू काळे व सरला भोळे' ही पत्रात्मक कादंबरी झालेली आहे. जीवनातील मूल्यविचार, श्रेय विवेक त्यांनी सामान्य माणसाच्या दृष्टीतून मांडण्याचा प्रयत्न केला.

हरिभाऊ आणि वा.म. जोशी यांच्या लेखनामागील प्रेरणा जरी भिन्न असल्या तरी दोघांनी आपले अनुभवविश्व या संसारचित्रातून व्यक्त केले.

या काळातील अत्यंत महत्त्वाच्या घटना म्हणजे पहिले महायुद्ध संपले तसेच १९२० मध्ये टिळकांचा मृत्यु झाला, या होत्या. या काळात स्वातंत्र्य लढा हा तीव्र गतीने सुरू झाला होता. टिळकांच्या मृत्यूनंतर या लढयाचे नेतृत्व महात्मा गांधीच्या हाती गेले. गांधीजीच्या विचारांचा, त्यांच्या आंदोलनाचा प्रभाव या काळातील लेखकांवर ही पडला होता. या काळात आशय व आविष्काराचा कादंबरी रचनेत विचार होऊ लागला. कथानक, व्यक्तिदर्शन, भाषा या घटकांना महत्व दिले जाऊ लागले. कथानकाचे विविध प्रयोग केले गेले. १९२४ नंतर मराठी ग्रामीण कादंबरी निर्मिती होऊ लागली. मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रारंभीच्या काळात महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा प्रभाव असला तरी पुढे जाता गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद यांच्या विचारसरणीचा अधिक प्रभाव होता. त्याबद्दल जयश्री नाफडे लिहितात, "१९२० नंतरचा काळ हा अनेक बाबतीत महत्त्वाचा काळ आहे. या काळात महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या विविध घडामोडी होऊ लागल्या. परिवर्तनवादी विचारांचे प्रवाह साहित्यिकांना भेडसावू लागले. या घटनांमुळे मराठीत ग्रामीण कादंब-यांची निर्मिती होऊ लागली."(६) या काळात लिहिल्या गेलेल्या

ग्रामीण कादंब-या म्हणजे प्र.ह. खाडिलकर यांची 'स्वाधीन संसार' (१९२७), भा.वि. वरेरकर यांची 'सात लाखातील एक' (१९३०), रा.शा. पाटील यांची 'सीता' (१९३१) गं.श. वाळिंबे यांची 'मोहित्यांची मंजुळा' (१९३१) वि.वा.हडप यांची 'पाणकळा' (१९३९), श्रीराम अत्तरदे यांची 'सावलीच्या उन्हात' (१९४०)या आहेत.

याच काळात दलित जीवन केंद्रस्थानी ठेवून कादंबरी लेखन सुरू झाले ते श्रीपाद कृष्ण कोल्हाटकर यांच्या 'श्यामसुंदर' (१९२४) या कादंबरीपासून. त्यानंतर वि. स.खांडेकर यांनी ही 'दोन ध्रुव' (१९३४), 'दोन मने' (१९३८) या कादंब-यांमध्ये दलित जीवन चित्रण केलेले आहे. या कादंब-या खांडेकरांनी गांधीजींच्या चळवळीने, अस्पृश्योद्धाराच्या प्रेरणेने लिहिलेल्या होत्या. विभावरी शिरूरकर यांची 'बळी' (१९४०), र.वा.दिघे यांनी 'कार्तिकी' या दलित जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-या या काळात महत्त्वाच्या ठरतात. हे कादंबरीकार दलितेतर होते.

इ.स. १९२० ते १९५० या कालखंडातील कादंब-यांबद्दल वि.बा.आंबेकर लिहितात, "गेल्या सुमारे तीस वर्षातील कादंबरी वाङ्मय व्याप्तीने हिशेबाने पाहिले तरी या तीस वर्षातील कादंबरी वाङ्मयाची निपज फार मोठया प्रमाणांत झाली असल्याचे आढळून येते. त्याचप्रमाणे लेखकांच्या दृष्टीनेही विचार केला तर निरनिराळया अभिरुचींच्या आणि मनोवृत्तीच्या लेखकानी या वाङ्मय प्रकाराच्या समृद्धीला भरपूर प्रमाणात हातभार लावलेला आहे, हेही सहज ध्यानात येते. या लेखकांच्या अवलोकनाचे विषय, चिंतनाची क्षेत्रे, अभिरुचीचे परीघ, निवडीचे व्याप्ति, मनोविश्लेषणाचा मगदूर समाजपरीक्षणाची ईर्ष्या, राजकारणाची जाणीव आणि मानवाच्या प्रगतीबद्दलची आस्था इत्यादि अनेक बाबतीतले पैलू जितके विविध तितकेच वैचित्र्यपूर्ण आहेत. शिवाय वाङ्मय समृध्द करण्याची अभिलाषा आणि नित्य नव्या प्रयोगांनी भाषा नटवून तिचें संवर्धन करण्याची हौस या गोष्टीही प्रत्येकाच्या स्वभावधर्मानुसार पण विविध पध्दतीने व्यक्त झाल्या आहेत. वा.म.जोशी, केतकर, वरेरकर, फडके, खांडेकर, माडखोलकर, सानेगुरुजी, वा.वि.जोशी

इत्यादि अनेक प्रभावी लेखक आपापल्या बौध्दिक आणि कलात्मक आयुधांनी याच काळांत क्रांतिकारक कामगिरी करण्यास प्रवृत्त झाले."(७)

पुढे ही या कालखंडातील कथानकातून राजकीय व सामाजिक प्रश्न ही मांडले जाऊ लागले. जीवन विषयक प्रश्नांना ही कादंबरीत स्थान मिळू लागले. नव्या तंत्र विषयक जाणिवां कादंबरीत आलेल्या दिसतात, हरिभाऊ, वा.म. जोशी व श्री.व्यं.केतकर यासारख्या लेखकांनी व्यक्ती व समाज यातील नाते,व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्व व व्यक्तीची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहणी याला महत्त्व दिले. डॉ. केतकर यांनी १९२६ पासून कादंबरीलेखन सुरू केले. त्यांनी 'गोंडवनातील प्रियंवदा'(१९२६), 'परांगदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), 'गावसासू' (१९३०), 'ब्राह्मणकन्या' (१९३०), 'विचक्षणा' (१९३७), 'भटक्या' (अपूर्ण) या कादंब-यातून समाजातले अनेक प्रश्न हाताळले. तसेच मराठीतील अन्य कादंबरीकारांपेक्षा केतकरांनी केलेले समाजचित्रण अधिक वास्तवदर्शी आहे. त्यांनी केलेले समाजाचे अवलोकन व आकलन अधिक खोल आहे कारण स्वत:च्या जीवनाचा विचार करायला लावणारे, नवे विचार नवीन भूमिकेवरून सांगणारे, जीवनाचा खरा अर्थ सांगणारे केतकरांचे लेखन होते. तसेच वास्तव संसाराचे स्पष्ट चित्रण सामाजिक भूमिकेतून कौटुंबिक भावनाचा विचार केतकरांनी आपल्या कादंब-यातून केलेला आहे. त्यांच्या कादंब-यात पात्रांची क्षेत्र व्याप्ती व विविधता दिसून होते. मराठी कादंबरीत केतकरांनी समाजाच्या विविध आणि संमिश्र स्वरूपाच्या अंतरंगाचा अत्यंत व्यापक दृष्टिकोनातून विचार केलेला आहे. केतकरांच्या कादंब-यांबद्दल भीमराव कुलकर्णी लिहितात," त्यांच्या कादंब-यांतील विचारसरणीमधून केतकर हे अत्याधुनिक अशा नव्या समाजरचनेचे पुरस्कर्ते होते, असे सांगण्यात येते आणि त्यांच्या लेखन स्वरुपावरुन त्यांनी कादंबरीलेखनाचा कलात्मकदृष्टया विचार केला नव्हता, असा निष्कर्ष काढण्यात येतो. त्यांची विवाहविषयक मते अतिशय क्रांतिकारक व वादळे उठविणारी अशा प्रकारची, तर टीकाकारांच्या फेकी निर्भयतेने व बेडरतेने झेलणारे असे ही त्यांचे एक चित्र रेखाटण्यात येते. डॉ. केतकरांच्या कादंब-या काळजीपूर्वक अभ्यासिल्या असता त्यांच्या

कादंबरीलेखनाला काही महत्त्वाचे तंत्र आहे व त्यातील आशयाचा विचार करताना केतकरांचे एक निराळेच व्यक्तिमत्व आपल्या मनात साकार होते असे मला वाटते."(८) पुढे ही भीमराव कुलकर्णी लिहितात," त्यांच्या सातही कादंब-यांचा विषय म्हणजे विवाह हा होय. विवाहसंबंधीची नानाप्रकाराची चर्चा करण्यासाठी निरनिराळया वैवाहिक जीवनावस्थेतील पात्रे त्यांनी निवडली आहेत. विवाहाचा लैंगिक प्रश्नांशी संबंध असल्यामुळे व समाजशास्त्रज्ञाच्या भूमिकेवरुन उघड पध्दतीने चर्चिण्याचे धारिष्टय केतकरांत असल्यामुळे त्यांच्या कादंब-यांमध्ये विविधता,आकर्षकता सनसनाटी व सामान्य वाचकांना वाटावी अशी काही ठिकाणी अश्लीलताही आली."(९) केतकरांच्या समाजशास्त्रीय कादंब-यांबद्दल दुर्गा भागवत लिहितात," समाजशास्त्रीय कादंबरीतही त्यांनी समाजशास्त्रीय प्रमेयांचे सोदाहरण विवेचन म्हणून कादंबरीला वेठीस धरलेले नाही. ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. त्यांनी जे समाजशास्त्रज्ञाचे ध्येय दिले आहे तें असें की, जो पडला असेल त्याच्यावर कोरडे ओढावे असे जगाचे धोरण असते. आणि त्यामुळे जगांत व्यक्ति कठोर होतात व समाजाचे स्वास्थ्य भंग पावते. जो पददलित असेल त्याला न्याय मिळवून देणे हे समाजशास्त्रज्ञाचे ध्येय आहे. त्याचप्रमाणे व्यक्ति पाप कां करते? तर ती कुठल्या तरी कारणाने दु:खी असते म्हणून. अशाप्रकारे मानवतावादावरच डॉ. केतकरांच्या कांदब-यांची रचना झालेली आहे आणि म्हणून त्यांतले वातावरण खूप उंच आणि मोठे आहे."(१०)

केतकरांप्रमाणेच ना.सी.फडके हे एक महत्त्वाचे कादंबरीकार. फडके यांनी १९१७ पासून कादंबरी लेखन सुरू केले. त्यांचे कादंबरीलेखन हरिभाऊ, वा.म.जोशी, केतकर यांच्या कादंबरी लेखनापेक्षा निराळ्या प्रेरणेचे आणि निराळ्या वळणाचे होते. फडके यांनी 'अल्ला हो अकबर' (१९१७), 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादूगर' (१९२९), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२), 'प्रवासी' (१९३७), 'आशा' (१९३७), 'उद्धार' (१९३५) 'अखेरच बंड' (१९४४) इ. अनेक कादंब-या लिहिल्या. फडके यांच्या कादंब-या रोमॅंटिक, रंजनप्रधान होत्या. कादंबरी मनोरंजक

करण्यासाठी स्वप्नरंजनाचा आश्रय घेतलेला दिसतो. त्यांच्या कादंब-यांतून तरूण मनाला तृप्तीचे समाधान प्राप्त होत असे. कारण त्यांनी तरूण स्त्री पुरूषांच्या स्वप्नाळु वृत्तीची भूक कादंब-याद्वारे भागविली. प्रणय विषयक चित्रण ही कादंब-यात आल्यामुळे त्यांनी लिहिलेल्या कादंब-या म्हणजे सुखासीन वाचकाला सुखविणा-या रोचक प्रणयकथाच होत्या. फडके यांनी कादंबरी लेखनाचा एक ठराविक साचा तयार केलेला आहे. कादंबरीमध्ये असलेली मध्यमवर्ती कल्पना, त्याला साम्य विरोधात पात्रप्रसंग, उत्सुकतावर्धक पेचप्रसंग, गुंतागुंत, निरगाठ व उकल अशी कथानकांची रचना असायाची. त्यांच्या कादंब-या निवेदन पद्धती, वर्णन कौशल्य कथानक बांधणीची कुशलता यामुळे वेगळ्या होत्या. तसेच त्यांच्या कादंब-याच विशेष म्हणजे त्यांची लेखनशैली आधुनिक, सहजसुंदर सोपी वाङ्मयीन लालित्यपूर्ण असायची. या कारणांनीच ना. सी. फडके यांना अपार लोकप्रियता लाभली. त्यांनी काही राजकीय कादंब-या लिहिल्या असल्या तरी त्यात राजकीय जीवन फारच उथळ स्वरूपात आलेले आहे. त्यांच्या लेखन काळ दरम्यान अनेक सामाजिक, राजकीय खळबळजनक घटना घडत होत्या, पण फडके यांच्या कादंबरी लेखनावर त्याचा काही फारसा परिणाम झाला नव्हता.

या काळात घडलेल्या सामाजिक, राजकीय घटनांमुळे समाजजीवन हळूहळू बदलू लागले होते. अशावेळी रूढचाकोरी सोडून विचार करणारी सुशिक्षितांची पिढी उदयाला होत होती. या पिढीचे एक कादंबरीकार पु.य. देशपांडे यांनी 'बंधनाच्या पलीकडे' (१९२७), 'सुकलेले फूल' (१९३१), 'सदाफुली' (१९३३), 'विशाल जीवन' (१९३९), 'काळी राणी' (१९४१), 'नवे जग' (१९४७) इ. कादंब-या लिहिल्या. या कादंब-या द्वारा अबोध मनाच्या गूढ विश्वात जाण्याची धडपड करण्याचे कथा वाङ्मयाचे बीज कादंबरी वाङ्मयात आणले. याकाळात ना.सी.फडके हे कलावादाचे पुरस्कर्ते होते. तेथे वि.स.खांडेकर हे या काळातील जीवनवादाचे मोठे पुरस्कर्ते होते. वि.स. खांडेकरांच्या लेखनाचा विचार करता लक्षात येते की खांडेकरांच्या मनोवृत्तीवर कोल्हटकर, गडक-यांची शैली, आगरकरांचा सुधारणावाद, हरिभाऊंची जीवनदर्शी दृष्टी यांचा परिणाम फार मोठया

प्रमाणात झाला होता. त्यांनी जीवन धारणेचा एक विशिष्ट आदर्श मनाशी बाळगून कादंबरी लेखन केले. त्यांच्या कादंबरी लेखनात कोणत्या ना कोणत्या तरी तत्त्वाचे प्रतिपादन आणि पुरस्कार करण्याचा हेतू दिसून येतो. त्यांनी जाणीवपूर्वक गांधीवादाचा पुरस्कर ही केलेला आहे. चंद्रकांत बांदिवडेकर खांडेकरांच्या गांधीवाद विषयी लिहितात, "तरीही खांडेकरांना वामन मल्हार जोशी प्रमाणेच गांधीवादचा मोठेपणा मान्य असला तरी अतिरेकीपणा पसंत नसावा व ते तत्त्वज्ञान व्यवहाराच्या दृष्टीने सामान्य मनाला झेपणारे नसावे असे वाटत असावे." (११)व्यक्तिगत गांधीबद्दल मात्र इतर कुणाही लेखकांपेक्षा खांडेकराना आदर अधिक आहे. त्यांनी 'हृदयाची हांक' (१९३०). 'कांचनमृग' (१९३१), 'उल्का' (१९३४), 'दोन ध्रुव' (१९३४), 'हिरवा चाफा' (१९३९), 'दोन मने' (१९३८), 'पांढरे ढग' (१९३९), 'पहिले प्रेम' (१९४०), 'क्रौंचवध' (१९४२) इ. कादंब-या लिहिल्या. या त्यांच्या कादंब-यातून त्यांनी मध्यमवर्गच उभा केलेला आहे. खांडेकरांच्या कादंब-यात काही सामाजिक प्रश्न ही मांडले गेले आहेत.

वि.स. खांडेकराच्या कादंबरीमध्ये जीवनाकडे पाहण्याची आशावादी दृष्टी, तळमळ, ध्येयवाद अशावादी सामाजिक भान हे सर्व घटक मौलिक असून ही रंजनपरतेने त्यांनी काही तडजोडी केल्या. अलंकारिक भाषा, रूपक प्रचुरता यामुळे त्यांच्या लेखनातील जीवनवादावर कलावादाचा प्रभाव ही दिसून येतो. आपले लेखन वाचकप्रिय करण्यासाठी म्हणून खांडेकरानी सुद्धा फडके प्रणित कालावादाचा थोडयाशा प्रमाणात स्वीकार केलेला दिसतो. असे असले तरीही खांडेकरानी ध्येयवादी विचारनिष्ठेने मरठी कादंबरीत सामाजिकतेची जोपासना करून फडके यांनी मराठी कादंबरीला एका सुखस्वप्नाच्या वृत्तीत गुंग करण्याचा प्रयत्ना केला होता. तेथे खांडेकरानी मराठी कादंबरीत वैचारिकतेचा जोम कायम ठेवण्याचा प्रयत्त करून मराठी कादंबरीला एक महत्त्वाची दिशा दिली, असे म्हणू शकतो.

या कालखंडातील आणखी एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणजे गजानन त्र्यंबक माडखोलकर. त्यांनी १९३३ पासून कादंबरीलेखन सुरू केले असून मराठीतले पहिले व

प्रमुख राजकीय कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी 'मुक्तात्मा' (१९३३) ही पहिली राजकीय कादंबरी लिहिली. त्यानंतर 'भंगलेले देऊळ' (१९३४), 'शाप' (१९३६), 'कान्ता' (१९३९), 'दुहेरी जीवन' (१९४०), 'डाक बंगला' (१९४२), 'नागकन्या' (१९४१), 'नवे संसार' (१९४१), 'चंदनवाडी' (१९४३) इ. कादंब-या लिहिल्या. त्यांनी आपल्या कादंब-यातून अभिनव विचारसरणी, राजकारणातील बारकावे प्रकट झालेले दिसतात. तसे माडखोलकर यांच्या काही कादंब-यामधून राजकीय चर्चा, दहशतवाद व क्रांतिकारक, चळवळी आलेल्या आहेत. त्यांच्या कादंब-यात आलेल्या तत्कालीन राजकीय वादप्रवादामुळे त्यांच्या राजकीय ध्येयवादामुळे त्यांना राजकीय कादंब-याचे जनक म्हटले जाते. माडखोलकरांच्या कादंब-यांचे विशेष म्हणजे त्यातील निवेदन पद्धति, व्यक्तिचित्रणे, कलात्मक तंत्र पद्धति, भाषा शैली हे आहेत. तसेच त्यांच्या बहुतेक कादंब-या स्त्रीपात्र प्रधान असून त्या विविध समस्यांचे विश्लेषण करणा-या ही आहेत.

या काळात फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या कादंब-यामुळेच मराठी कादंबरी लेखनाला आकार मिळाला असला तरी अन्य कादंबरीकारांचेही लेखन वैशिष्ट्यपूर्ण झाले होते. भा.वि.वरेरकर, य.गो.जोशी, बा.सं. गडकरी, न.चिं.केळकर, वि.वि. बोकील, मो.ग. रांगणेकर, रघुवीर सामंत इ. या कादंबरीकारांद्वारा अनेक नवीन विषय, नवीन उपक्रमांवर कादंब-या लिहिल्या गेल्या. परंतु या कादंबरी लेखनामुळे मराठी कादंबरीचा मन:कल्प मात्र घडवून आणता आला नाही.

यासुमारास साने गुरूजींनी एक विशिष्ट मूल्यविचार गृहीत धरून सर्व सामान्य स्वरूपाच्या सद्गुणाची शिकवण देणाच्या कादंब-याचा सोज्वळ प्रकृतिचा लेखन प्रवाह निर्माण केला. साने गुरूजींच्या लेखनाची प्रेरणा आत्मकेंद्री नसून आत्मनिष्ठ होती. त्यांचे साहित्य म्हणजे एका कवी हृदयाची निर्मिती होती. त्याच्या साहित्यात आलेले तत्कालीन जनजीवनाचे आदर्श, ध्येय यांचा उन्मेष स्पष्टपणे दिसतात. त्यांनी मराठी कादंबरीमध्ये संयत प्रेमाची उज्ज्वल धारा आणून सात्विक प्रणयाचे दालन उघडले.

साने गुरूजींनी अत्यंत प्रामाणिकपणे भावनेच्या पातळीवर जगणारी स्वातंत्र्याच्या आकांक्षानी पेटून सर्वस्वाचा होम करणारी तद्वत देशी मने प्रभावीपणे लेखनात आणली. तसेच त्यांनी मराठी मनाचा ठसा असलेली देशी भाषा वापरली.त्याबद्दल नेमाडे सांगतात,"मला साने गुरुजी हाच एकमेव मोठा कादंबरीकार वाटत होता. अजूनही तसंच वाटतं.त्यांच्या श्यामच्या लायकीचा मराठी नायक दुसरा नाही.भटका,निराधार सर्व सृष्टीची परिमाणे लाभलेला असा नायक. साने गुरुजी हाच असा कादंबरीकार आहे,की ज्यानं स्वत:चं असं विश्व निर्माण केलं. त्यांना स्वत:ची जीवनदृष्टीही होती. जी इतर कुणाजवळ दिसत नाही. समाजाच्या सर्व स्तरांना मराठी कादंबरीनं ख-या अर्थानं स्पर्श केला, तो एकट्या साने गुरुजींमध्येच. ह्या बाबतीत त्यांचा आवाकाही विलक्षण आहे."(१२)

त्यांच्या 'धडपडणारी मुले' (१९३७) या कादंबरीमध्ये विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व घडविणा-या एका कर्मयोगी शिक्षकाची कथा माणुसकीच्या जिवंत गहिवरातून लिहिलेली आहे तर 'पुनर्जन्म' (१९३९) मध्ये स्त्रियांच्या एकनिष्ठ व पवित्र प्रेमाची कथा आहे. त्याशिवाय त्यांनी 'श्याम' (१९३७), 'जीवनकलह' (१९३८), 'आस्तिक (१९४०), क्रांति(१९४०), 'गोडशेवट' (१९४३), 'यति की पति?' (१९४३), 'तीन मुले' (१९४४), 'रामाचा शेला' (१९४४), 'सती' (१९४४), 'संध्या' (१९४६), 'चित्रकार रंगा' (१९४८), 'नवा प्रयोग' (१९५०) अशा अनेक कृती निर्माण केल्या. याच काळात वि.दा. सावरकर यांनी मला काय त्याचे ?' व 'काळे पाणी' या कादंब-या लिहिल्या.

या कालखंडामध्ये ही स्त्रियांनी लेखन करून स्त्री आणि जीवन, तिच्या समस्या या विषयी विचार प्रकट केले. काशीताई कानिटकरांनी 'रंगराव', 'पालखीचा गोंडा', जानकीबाई देसाई यांनी 'गृहलक्ष्मी', सौभाग्य तिलक', 'मूकनायिका' इ.कादंब-या लिहिल्या. अशा अनेक स्त्री कादंबरीकार लेखन करीत होत्या. या कादंब-यांचे विषय वैवाहिक जीवनाच्या समस्या, जरठ-तरूणी विवाह, हुंडयाची, पद्धती असायचे. या कादंब-याचे मुख्य विशेष म्हणजे जे स्त्रियांनाच जाणवेल, बोचेल असे अनुभव जे पुरूष लेखकाला शोधून ही सापडणार नाही, असे अनुभव त्यामधून व्यक्त झालेले दिसतात. तर

दुसरीकडे या स्त्रियांना जे जाणवले ते धीटपणे व्यक्त करणे कठीण वाटत होते. पुढेजाता विभावरी शिरूरकर यांनी हिंदोळ्यावर 'विरलेले स्वप्न' इ. कादंब-या लिहिल्या. विद्या देवधर या कादंब-यांबद्दल लिहितात, "विभावरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर' (१९३४) 'विरलेले स्वप्न' (१९४४) व 'बळी' (१९५०) या १९५० पर्यंतच्या कादंब-या एकूण मराठी कादंबरीच्या इतिहासातही महत्त्वाच्या आहेत. एवढेच नव्हे, तर मराठी ललित साहित्यालाच नवे विचार आणि नवे विषय या कादंब-यांनी दिले आहेत. स्त्रीचे लेखनविषय, तिच्या मर्यादा यांविषयी समाजाच्या ठराविक धारणा होत्या. त्या मर्यादांना ओलांडून विभावरी शिरुरकरांनी लेखन केले. (बाळूबाई खरे यांनी 'विभावरी शिरूरकर' या टोपण नावाने लेखन केले. लग्नानंतर त्या मालतीबाई बेडेकर झाल्या). आज स्त्रियांचा व दलितांचा विचार सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अपरिहार्य ठरला आहे. पण मराठी साहित्यविश्वात तो विचार प्रथम विभावरी शिरूरकरांनी केला. खंबीर पण विचारी स्त्री म्हणून, एक माणूस म्हणून, स्त्रीचा विचार ' हिंदोळ्यावर' व 'विरलेले स्वप्न' मध्ये केला आहे आणि 'बळी' ही मराठीतील दलित जीवनावरची पहिली महत्त्वाची कादंबरी आहे. स्त्रीवादी व दलित साहित्याच्या प्रारंभीच्या खुणा मालतीबाई बेडेकर यांच्या त्यांच्या कादंब-यातून उमटल्या आहेत."(१३) गीता साने यांनी स्त्रीपुरूष संबंध, सामाजिक प्रश्न हाताळून निखळलेली 'हिरकणी (१९३६), 'वठलेला वृक्ष' (१९३६), 'हिरवळीखाली' (१९३६), 'लतिका' (१९३७), 'फेरीवाला' (१९३८), 'आविष्कार' (१९३९) इ. कादंब-या लिहिल्या. या प्रवृत्तीच्या कादंब-या पुढे मालतीबाई दांडेकर, प्रेमा कंटक, शांता शेळके, कृष्णाबाई मोटे, सरोजिनी बाबर, लीला देशमुख इ. लेखिकांनी लिहिल्या.

### ❖या काळातील भाषांतरीत कादंब-या:

त्यात वि.सी. गुर्जर, वा.गो. आपटे इ. लेखकांनी बंगाली कादंब-यांची भाषांतरे केली. त्याचबरोबर कोरेली, शालेट ब्रान्टे, डिकन्स, जेन आस्टिन इ. पाश्चात्य कादंबरीकारांच्या कृतीही मराठीत आल्या. या भाषांतरीत कादंब-यांचा मराठी कादंब-यांवर

फारसा परिणाम झाला नसला तरी बंगाली कृती मधील भावविवशता मात्र मराठी कादंबरीने स्वीकारली.

## ❖या काळातील कादंब-यांचे विशेष

१) या काळात कादंबरीकडे मनोरंजनाचे, उपदेश देण्याचे साधन म्हणूनच पाहिजे जात असे. यातून मध्यमवर्गाचे चित्रण येण्याचे कारण बहुतांशी लेखक मध्यमवर्गातून आलेले होते. जीवनाच्या विविध अंगांचा, विविध समस्यांचा विचार करणारी कादंबरी निर्माण होण्यास अनेक मर्यादा होत्या. कारण एका तंत्राच्या चौकटीत मराठी कादंबरी बंदिस्त झालेली दिसून येते. या चौकटीबाहेर जाऊन लेखनाचा प्रयत्न कारणा-यांमध्ये डॉ. केतकर, भा.वि.वरेरकर, हडप न.चिं. केळकर, वि.दा.सावरकर इ. चा उल्लेख करू शकतो.

२) या सामाजिकतेबरोबर ऐतिहासिक कादंब-या लिहिल्या गेल्या. ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून हडप, नाथमाधव, ना.ह. आपटे, गो.गो. मुजुमदार, वि. वा. भिडे, ल. ना. जोशी इ. चा. उल्लेख करू शकतो. तसेच पौराणिक राजकीय कादंब-यांच्या क्षेत्रातही मराठी कादंबरीकारांची उदासिनता दिसून येते. या प्रवृत्तीच्या कादंब-याही कमी प्रमाणातच लिहिल्या गेल्या.

३) या कालखंडातील काही कादंब-या गांधीवादाने प्रभावीत असल्या तरी महाराष्ट्रात गांधीवादाला फारसे स्थान मिळाले नाही. गांधीवादाचा प्रभाव वरपांगी राहण्याचे खरे कारण हा या काळातील रोमँटिक साहित्य प्रवृत्ती होती. गांधीवाद मराठी कादंबरीकारांना त्याच्या सुखवादी प्रवृत्तीमुळे मानवला नव्हता.

४) ग्रामीण जीवनात घडणा-या अनेक घटनांची दखल मराठी साहित्यात घेतली जात नव्हती. मराठी साहित्याने ग्रामीण जीवन साहित्याकडे दुर्लक्ष केलेले होते. अशावेळी महात्मा फुले, महात्मा गांधीजींनी बहुजन समाजाचे लक्ष खेडयाकडे वळवले. साहित्याद्वारे सामाजिक परिवर्तन घडू शकते. ही जाणीव त्यांनी लोकाना दिली महात्मा फुले यांच्या या महत्त्वाच्या कार्याबद्दल जयश्री नाफडे लिहितात, "मराठी साहित्यातील विविध

वाङ्मयप्रवाहांपैकी ग्रामीण साहित्यावर महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा प्रभाव जाणवतो. महात्मा फुल्यांची वैचारिक भूमिका ग्रामीण साहित्याने स्वीकारली. ग्रामीण साहित्यातून मानवमुक्तीचे तत्वज्ञान प्रकट होऊ लागले. त्यातून मानवी हक्क, न्याय, शांतता आणि मानवीची उन्नती ह्या फुले यांच्या तत्वांना स्थाना मिळाले. शूद्र आणि अतिशूद्र यांची होणारी पिळवणूद, बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची व अधिकारांची शिफवणूक देणे आणि परंपरेच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून त्यांना मुक्त करणे हे 'सत्यशोधक' मधून सांगितलेले ध्येय-धोरण ग्रामीण साहित्याचे उद्दिष्ट ठरले."(१४)

मात्र १९२४ नंतर मराठी ग्रामीण कादंबरी निर्मिती होऊ लागली आणि मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रारंभीच्या काळात महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा प्रभाव असलातरी पुढे जाता गांधीवाद, मावर्सवाद, समाजवाद यांच्या विचारसरणीचा अधिक प्रभाव होता. त्याबद्दल जयश्री नाफडे लिहितात, "१९२० नंतरचा काळ हा अनेक बाबतीत महत्वाचा काळ आहे. या काळात महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या विविध घडामोडी होऊ लागल्या. परिवर्तनवादी विचारांचे प्रवाह साहित्यिकांना भेडसावू लागले. या घटनांमुळे मराठीत ग्रामीण कादंब-यांची निर्मिती होऊ लागली. "(१५)

## ३) इ.स.१९४१ ते १९६० पर्यंतच्या कादंब-या :

इ.स.१८८६ ते १९४० च्या कालखंडातील विविध प्रेरणांमुळे या काळातील मराठी ग्रामीण कादंब-यांचा सशक्त प्रवाह आलेला दिसतो. या काळातील ग्रामीण कादंब-यांमध्ये म.भा.भोसले यांची 'समरांगण' (१९४१), वि. द. चिंदरकर यांची 'महापूर' (१९४३), बा.सी. मर्ढेकर यांची 'तांबडी माती' (१९४३) र.वा.दिघे यांची 'सराई' (१९४३), ग.ल. ठोकळयांची 'गावगुंड' (१९४५), मर्ढेकर यांची 'पाणी' (१९४८), श्री.ना.पेंडसे यांची 'एल्गार' (१९४८) ' हद्दपार' (१९४०), बा.भ. बोरकर यांची 'भावीण' (१९४०), मधु मंगेश कर्णिक यांची 'वाडगीण', विभावरी शिरूरकर यांची 'बळी' (१९५०) इ. ग्रामीण कादंबरीचे लेखन झाले. त्यामध्ये प्रारंभीच्या कादंब-यांमध्ये खेडयांमध्ये सुधारणा करायच्या बाबतीत विचार, खेडयातून शहरात आलेल्याचे होणारे हाल अपेष्टा इ. विषयांवर

लेखन झाले तर पुढे जाता शेतकरी आणि शेतीविषयक प्रश्न, खेडयातील मजुर आणि त्यांचे मालक यांचे वर्गसंघर्ष कादंब-यामधून येऊ लागले. १९५०च्या नंतरच्या ग्रामीण कादंब-यांमध्ये मात्र जीवनातील वास्तवता, आधुनिकीकरणामुळे उदध्वस्त इ. होऊ लागलेल्या ग्रामीण संस्कृतीचे विषय हाताळले गेले, तसेच विशिष्ट भूप्रदेशाला महत्त्व देणारे, विविध जाती जमातीच्या प्रश्नांना महत्त्व देणारे लेखनही झाले.

त्यामुळे या काळात ग्रामीण कादंब-यांमध्ये अनेक परिवर्तन आल्याने ग्रामीण जीवन सर्वबाजूंनी स्पष्ट होऊ लागले. त्या बद्दल जयश्री नाफडे लिहितात, "या कालखंडाने केवळ स्वप्नरंजकतेलाच महत्त्व दिले असे नव्हे तर ठोकळ,दिघे,पेंडसे, मर्ढेकर व विभावरी शिरुरकर यांच्यासारख्या महत्त्वपूर्ण लेखकांनी आपल्या कादंब-यांद्वारे खेड्याचा विकास कसा करता येईल याबरोबरच विविध जमातीतील चित्रण करून, त्यांच्यातील अंधश्रद्धा दूर करून, त्यांच्यात आत्मभानाची जागृती कशी करता येईल या दृष्टीने प्रयत्न केला. हे सर्व दर्शवित असताना त्या त्या जमातींचाही विकास करणे हे आपले कर्तव्य आहे, या जमातींच्या विकासात देशाचा विकास आहे ह्यावर लक्ष केंद्रित केले, याशिवाय या कालखंडातील कादंब-यांवर व्दितीय महायुध्दाचे भीषण परिणामही जाणवतात." (१६)

१९३९ ते १९४७ या काळात निर्माण झालेल्या विशेष कादंब-या म्हणून विश्राम बेडेकरांची 'रणांगण' (१९३९), र.वा. दिघे यांची 'पाणकळा' (१९४०) तसेच मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' (१९४२) यांचा उल्लेख करू शकतो. त्यात 'पाणकळा', 'रात्रीचा दिवस' यासारख्या काही कादंब-याद्वारा मराठी कादंबरीच्या विकासाच्या काही दिशा स्पष्ट झाल्या. मराठीत 'रणांगण' द्वारा एक श्रेष्ठ कादंबरीचा अनुभव प्राप्त झाला. या कादंबरीमुळे मराठी कादंबरीला विकासाचे वळण लागले असले तरी मराठी कादंबरी फडके, खांडेकर माडखोलकर यांच्या कादंबरी लेखनाच्या तंत्रातून मुक्त झाली नाहीच. या काळात कादंबरी लेखनामागच्या प्रेरणा बदलत होत्या, तिची संकल्पना, प्रयोजन बदलत होते. तिच्या रचनेच्या घटकांची जाणीव होऊ लागली होती. तरीही या काळात फडके, खांडेकरानी आपल्या लेखनशैलीत बदल केला नव्हता. त्याबद्दल भालचंद्र फडके लिहितात, "फडके खांडेकरांदी

अनेक कादंबरीकारांचे या कालखंडातले लेखन पाहिले की 'रणांगणा' सारखे विकासशील वळण घेऊनही मराठी कादंबरी आरंभबिंदूशी पुन: आलेली आहे, हे जाणवते, मराठी कादंबरी 'विस्तार' पावत होती, तिच्या संख्यात्मक वाढीवर काही जण खूष होते. पण खरे म्हटले तर तिचा विकास होत नव्हता, तिचा मन:कल्प घडून येत नव्हता." (१७) 'पाणकळा' या कादंबरीपासून प्रादेशिक कादंबरीचा नवा प्रवाह निर्माण झाला. या कादंबरीत र.वा.दिघे यांनी निसर्ग व माणूस यामध्ये असलेल्या नात्याचा, अर्थपूर्णतेचा प्रत्यय नव्याने दिला. ही कादंबरी फडके खांडेकराच्या कादंब-यापेक्षा वेगळ्या वळणाची होती. या प्रवाहात त्यानंतर कवठेकर, ठोकळ इ. च्या कादंब-याही प्रसिद्ध झाल्या. तेथे मर्ढेकरांच्या 'रात्रीचा दिवस' या कथात्मक प्रयोग कादंबरीमुळे कथानक, व्यक्तिदर्शन, मनोविश्लेषण हे नवीन परिमाण मराठी कादंबरीला लाभले. या कादंबरीच्या लेखनात संज्ञाप्रवाह ही पद्धत वापरलेली आहे. मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' त्याशिवाय 'तांबडी माती' (१९४३), 'पाणी' (१९४८) या कादंब-या लिहिल्या. या संज्ञाप्रवाही पद्धतीमुळे व्यक्तीच्या अंतर्मनाचे सूक्ष्मचित्रण करणे शक्य होऊन त्याच्या व्यक्तिमत्वावर अधिक प्रकाश टाकला गेला. या काळात चंद्रकांत काकोडकर, बिवलकर ग.य. चिटणीस, ना.के. महाजन, श्रीधर देशपांडे इ. कादंबरीकर लोकप्रिय स्वरुपाचे लेखन करीत होते.

१९३४ नंतरच्या काळात साधुदास, वा.कृ. चोळकर, र. के. पटवर्धन, अ.प.भांडारकर, न.चिं.केळकर इ. कादंबरीकारानी कादंब-या लिहिल्या. तसेच तत्कालीन कवी मंडळातील काही कवी या काळात कादंबरीलेखनाकडे वळलेले दिसतात. मर्ढेकर, मनमोहन, बा.भ.बोरकर, वि.वा. शिरवाडकर, आण्णाभाऊ साठे इ. कवींनी कादंबरीलेखन केले होते. मर्ढेकरांच्या कादंबरी लेखनाचा विचार आपण केलेला आहे. बा.भ. बोरकर यांनी 'मावळता चंद्र' (१९३८), 'अंधारातील वाट' (१९४३) जळते रहस्य (१९४५), भावीण (१९५०), वि. वा. शिरवाडकर यांनी 'वैष्णव' (१९४६), 'जान्हवी' (१९५२), आण्णाभाऊ साठे यांनी 'चित्रा' (१९५१) यासारख्या कादंबरीलेखनातून कादंबरीवाङ्मयात भर घालण्याचा प्रयत्न केला.

१९४७ ते १९६० या काळात प्रारंभीची कादंबरी फडके खांडेकरांच्या प्रभावाखालीच होती. तरीही या कादंब-यांमध्ये जीवनातील वास्तवता, स्वातंत्र्यसंग्राम, आपल्या समाजातील अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्देत, अडकलेल्या निम्न थरातील जमातींचे, त्या समूह मनाचे चित्रण करणे, आपण जेथे वाढलो, जगलो तो प्रदेश तो परिसर आपल्या जाणिवाच्या मदतीने जिवंत करणे इ. प्रेरणा प्रभावशाली होऊ लागल्या. त्यातूनच 'पाणकळा', 'रात्रीचा दिवस', 'रणांगण' सारख्या कादंब-या लिहिल्या जाऊन कादंबरीच्या क्षेत्रात विविध स्थित्यंतरे घडून येऊ लागले. अशा विविध अंगी बदलांमुळे, प्रेरणामुळे एक वेगळ्या अनभवाच्या कादंब-या लिहिल्या गेल्या. विभावरी शिरूरकर यांनी 'बळी' (१९५०) कादंबरी लिहून वाचकांना एक वेगळ्या अनुभव करून दिला. समाजाच्या मध्यमवर्गीय चौकटी पलीकडचा माणूस, समाज, म्हणजे गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्यांच्या जीवनातील प्रश्न त्यात बाईंनी मांडले. त्यातून एक सामाजिक समस्या मांडून समाज जागृतीच्या हेतूने जीवनातील दाहकता स्पष्ट करत अन्याय, अत्याचारामध्ये अडकलेल्या जमातीचे चित्रण केलेले आहे. बा.भ.बोरकर यांनी 'भावीण' (१९५०), मधु मंगेश कार्णिक यांनी 'वाडगीण' (१९५०) या कादंब-यांमधून या समाजात अन्न, वस्त्र, निवारा सारख्या सामान्य गरजा भागत नसून अज्ञान, अंधश्रध्देने आपल्या समाजातील काही जाती जमातींचे शोषण केले जाते. या नवीन प्रवृत्तीमुळे मराठी कादंबरीत अपरिचित, अनोखे अनुभवविश्व प्रकट होऊ लागले.दलितेतर लेखकांनी दलित जीवन चित्रित केलेल्या कादंब-या म्हणजे वि.स.खांडेकरंच्या 'दोन मने', 'दोन ध्रुव', वि.वा.हडपयांच्या 'पारिजातकाची फुले', 'गोदाराणी', ग.त्र्यं. माडखोलकर यांची 'चंदनवाडी' वि.द. चिंदरकर यांची 'महापूर', विभावरी शिरूरकर यांची 'बळी', मधू मंगेश कर्णिक 'भाकरी आणि फूल' आहेत. परंतु दलितांच्या मनाचे, दु:खाचे नसल्याने त्यांचे चित्रण प्रत्यकारी होत नाही. तेथे दलिताविषयी व्यापक मानवतावादी भूमिका देवून विभावरी शिरूरकर (बळी) मधू मंगेश कर्णिक (भाकरी आणि फूल) यांनी केलेले चित्रण वास्तव असे पहायला मिळते असे दलितेतर लेखक अपवादच आहे.

श्री. ना. पेंडसे यांनी " 'प्रादेशिक' कादंब-यांच्या प्रवाहात कादंबरीलेखन केले. त्यांनी 'एल्गार' (१९४९) पासून कादंबरी लेखनला प्रारंभ केला. त्यानंतर 'हद्दपार'(१९५०), 'गारंबीचा बापू' ( १९५२), 'हत्या'(१९५७), 'कलंदर'(१९५९), 'रथचक्र'(१९६२) या कादंब-या लिहिल्या. पेंडसे यांनी विशिष्ट प्रदेश आणि त्या प्रदेशातल्या मातीत वाढलेली माणसे यांच्या आंतरिक नात्याचे चित्रण करून मराठी कादंबरीच्या विकासाला एक दिशा दिली. इतकेच नाहीतर 'कादंबरी म्हणजे सामाजिक किंवा राजकीय स्तराखाली असलेली प्रणयकथा. अशी जी धारणा झाली होती ती धारणा पेंडसे यांच्या कादंब-यांनी बदलून टाकली." असे भालचंद्र फडके यांना वाटते. (१८)
पेंडसे यांच्या प्रमाणेच गो.नी.दांडेकर यांनी आपल्या कादंब-यांतून स्वत: अनुभवलेला प्रदेश चित्रित केला. कारखाने, उद्योगधंदे यामुळे ग्रामीण माणसांचा ओघ शहराकडे वळल्यामुळे खेडी ओस पडू लागली. तसेच या आधुनिकीकरणात जुनी मूल्ये ढासळू लागली. याचे चित्रण त्यांनी 'पडघवली' (१९५५) 'शितू' (१९५८), माचीवरला बुधा (१९५७) इ. कादंब-यातून केलेले आहे. त्याच्या लेखनातून प्रमुख्याने संस्कृती -हासाचे दु:खही व्यक्त झाले आहे. प्रादेशिक कादंबरीच्या प्रवाहाला जोमदार करणारे एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून गो.नी.दांडेकरांचे नांव घ्यावे लागते. त्यांच्या कादंब-यातून व्यापक असे जीवनदर्शन घडत नसले तरी जीवनाच्या वैविध्याची जाणीव प्रकट होते.

या कालखंडात लिहिली गेलेली व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी ग्रामीण कादंबरी प्रवाहातील महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. तर आण्णासाहेब साठे यांची 'फकिरा' (१९५९), उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०) या कादंब-यामधून खेडयातील जाती जमातीचे चित्रण, आधुनिकीकरण ग्रामीण परिसरात होऊ लागलेले बदल चित्रित केलेले आहे. आण्णाभाऊ साठे यांनी 'फकिरा' (१९५९) ही कादंबरी लिहिली. यांची कादंबरी परंपरागत ग्रामीण व्यवसायकांची कुंचबणा व्यक्त करते. यातील प्रादेशिकता ही जातीजमातीच्या जीवनाशी निगडित असून प्रादेशिकतेचा प्रवाह समृध्ध करणारी ही कादंबरी आहे. ज्यात ग्रामीण जीवनातील काही वैशिष्टयपूर्ण अशा

काही घटना, तत्कालीन परिस्थितीच्या आधारे कथानक असून प्रादेशिक वैशिष्टयांनाही चित्रित केलेले आहे.

या काळातील 'बनगरवाडी', 'फकिरा', 'धग' या कादंब-याबद्दल नागनाथ कोत्तापल्ले लिहितात. " दुर्दैवाने 'बनगरवाडी' चा अपवाद सोडला तर दुस-या दोनही कादंब-याची दखल मराठी समीक्षेने घेतली नाही. अर्थात 'फकिरा' आणि 'धग' या दोन कादंब-यांना मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात फार महत्वाचे स्थान आहे. लोकजीवन आणि लोकसंस्कृती, खेड्यातील गाववाडा, बलुतेदार आणि गाव-कामगार यांचे संबंध यांचे मोठे समर्थ चित्रण 'फकिरा' मध्ये आढळते. तसेच इंग्रजांविरुद्ध दलितांनी आपल्या अस्मितेसाठी पुकारलेला लढाही प्रभावी होऊन या कादंबरीतून प्रकट होतो. 'धग' ही कादंबरीही अनेक अर्थानी लक्षणीय आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याशी धैर्याने दोन हात करणा-या असंख्य स्त्रियांचे प्रतिनिधित्व 'धग' मधील कौतिक करते. 'कौतिक' ही एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. तिरसट सासरा, संसारात लक्ष नसणारा नवरा आणि मनाप्रमाणे न वागणारा मोठा मुलगा यांच्या कचाट्यात सापडलेली व अंतिमत: भ्रमिष्ट झालेली 'कौतिक' वाचकाला अस्वस्थ करून सोडते. या दोन्ही कादंब-या मराठीतील फार महत्वाच्या कादंब-या आहेत. किंबहुना १९६० नंतर जी एकूणच मराठी कादंबरी बदलली तिचा पायवर या कादंब-यामधून लागतो. असे असते तरी माडगूळकर सोडले तर उरलेले दोन लेखक पुढे अनेक वर्ष आमच्या समीक्षकांना माहीत नव्हते, स्वाभाविकपणेच या कादंब-याची चर्चा कधी झालीच नाही. याचे कारण काय असावे? हा कालखंड नववाङ्मयाचा. म्हणजे रूपवाद्यांच्या, कलावाद्यांच्या प्रभावाचा. त्यामुळे जीवनाच्या अध:स्तराचे चित्रण करणा-या या कादंब-या मराठी समीक्षकांना न दिसणे स्वाभाविकच होते."(१९)

व्यंकटेश माडगूळकरांनी 'वावटळ' (१९६४), 'पुढचं पाऊल' (१९७८), 'करूणाष्टक' (१९८२), 'सत्तांतर' (१९८२) इ. कादंब-यातून या माणसाचे स्वत:शी,

निसर्गासी समाजाशी असलेले नाते प्रकट केले आहे.इतकेच नाहीतर महाराष्ट्रातील एका पोट संस्कृतीचे निसर्गसहज प्रकृतिनिष्ठ जगणे वास्तवाभिमुखतेने आलेले आहे.

मराठी कादंबरीचा इतिहास पाहता लक्षात येतेकी १९४७ नंतरचा मराठी कादंबरीचा विकास अनेक दिशांनी झालेला दिसतो. १९४०च्या नंतर 'रणांगण', 'रात्रीचा दिवस', 'पाणकळा', 'बळी', 'बनगरवाडी' घग इ. कादंब-या लिहिल्या जाऊन मराठी कादंबरीत अनेक नवे अनुभवविश्व प्रकाट करणारे क्षेत्र निर्माण झाले. या काळातच मराठी कादंबरीचे अनुभवक्षेत्र भाषाक्षेत्र विस्तारले गेले. साहित्यात कधीच न आलेल्या बहुसंख्याक जनसमूहाच्या व्यथा वेदना, उपेक्षित असे जीवन कादंबरीमध्ये जीवननिष्ठ भूमिकेतून मांडले जाऊ लागले. अशा प्रकारे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मराठी कादंबरीने विविधरूपे घेतली. १९६० मध्ये भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' कादंबरी प्रकाशित झाली आणि मराठी कादंबरीमध्ये एक नवा वास्तववादी प्रवाह पुन्हा नव्या जोमाने वाटू लागला. मराठी कादंबरीत एक ऐतिहासिक टप्पा म्हणून या कादंबरीचे महत्त्व आहे. भालचंद्र नेमाडे या कादंबरीबद्दल लिहितात, "मराठी कादंबरीच्या आजपर्यंतच्या विकासातली ही शेवटची शाखा आहे. यमुना पर्यटन पासून सुरू झालेली, वास्तवाशी अतूट नाते सांगणारी कृतिप्रधानता सर्जकतेचा अविभाज्य घटक मानणारी ही कादंबरी जगण्याचा नवा मूल्यविचार मांडते. त्यामुळे नवी नैतिकता पुढे मांडत ही कादंबरी इतर प्रवृत्तींपासून वेगळी झाली." (२०) पुढे या नव्या कादंबरीचे रूप स्पष्ट करताना नेमाडे लिहितात, "ह्या कादंब-यांची संरचना विस्तृत आणि शेवट खुले असतात. युनिटीचे तत्त्व दर्शनी नसून आंतरिक असते. पात्रांचे अवास्तव ठोकळे नसतात. भाषा जीवनातली प्रत्यक्ष बोलीच असल्याने वास्तवाचे खोटे चित्रण आणि भावविवशता शक्यच नसते. रीतिप्रधान पंडिती प्रवृत्तीतील भाषेची भावुकता आणि आकृतिनिष्ठ कृत्रिम प्रसंग नसतात. ह्या सर्व कादंब-यातील निवेदनात उपरोधावर बराच भर आढळतो. कादंबरीकार स्वत:च्या पात्राकडेही उपरोधाने पाहताना दिसतात. स्वत:च्या पात्रांवर खूष असण्याची रूढ मराठी पात्रनिर्मितीची परंपरा ह्यामुळे संपुष्टात येत आहे. रूढ मराठी कादंबरीने जोपासलेले सोईस्कर पूर्वग्रह ही नव्या कादंबरीने नष्ट केले. टोळीवजा

समूहां मधून पोटसमूहात व पोटसमूहामधून समाजाकडे जाण्याचा मराठी कादंबरीचा प्रवास पद्मनजी–आपटे– सानेगुरूजी असा आता विशाल मानवी समाजाकडे जाताना नव्या कादंबरीत दिसतो. एकूण मराठी समाजाची कुवत पाहता हा प्रवास आनंददायक आहे. तरी संपूर्ण मानवी अस्तित्वाचा विचार मराठी कादंबरीला अजून करता येत नाही, हे ही कबूल केले पाहिजे." (२१) यामधूनच नव्या कादंबरीचे विशेष आणि तिला पडलेल्या मर्यादा ही लक्षात येतात.

या नव्या कादंब–यांचे लेखन विविध जातीजमातीच्या विविध थरांतील लेखकांकडून झाले. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, आर्थिक, जातीविषयक सवलती यातून समाजातील अनेक उपेक्षित स्तर लिहिते झाले. या कादंबरीकारांनी नवे आशयद्रव्य निवडले, व्यक्ती व समाज यांच्यामधल्या दुव्याला महत्त्व दिले. वास्तवाला अधिक महत्त्व देऊन भूतकाळ किंवा अदभुतता किंवा कल्पित अवास्तव बाजूला सारले. या वर्तमानात वास्तवात ही सौंदर्य असू शकते हे सिद्ध केले. तसेच हे कादंबरीकार विविध सामाजिक थरातून आलेले असून तीव्र संवेदनक्षमता असलेले आहे. यामुळेच एक सशक्त नव्या कादंब–याचा प्रवाह निर्माण झाला, असे लक्षात येते.

१९४० ते १९६० च्या कालखंडात ग्रामीण कादंबरीचे विविध आविष्कार प्रकट होऊन ती लोकप्रिय होऊ लागली होती. १९६० नंतर मात्र अनेक कादंबरीकारानी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह सशक्त केलेला आहे. त्यामध्ये रणजित देसाई यांची 'बारी' (१९५९) 'माझा गाव' (१९६०) चंद्रकांत काकोडकर यांची 'अन्नपूर्णा' (१९६०) दिनकर देशपांडे यांची 'तपझिरा' (१९६०)इ.कादंब–या येतात.

## ४) इ.स १९६१ ते १९८५ याकाळातील कादंब–या :

### ❖विशेषत: दलित व ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात –

१९६०नंतर मराठी साहित्याच्या क्षेत्रात चळवळी झाल्या. त्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य , जैन साहित्य , आदिवासी साहित्य ,खिस्ती मराठी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य ,इ. आहेत. या चळवळीबद्दल असे म्हणता येते की,

"१९६० नंतरच्या या सर्व चळवळी लोकशाहीची मूल्ये मानणा-या आहेत. ही लोकशाही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर कार्यरत असली पाहिजे असे अपेक्षित आहे. वर्ण,वर्ग, जात यांच्यावर आधारित शोषण व्यवस्थेला नकार हे चळवळींचे मुख्यसूत्र आहे. साहित्यातून माणसाच्या जगण्याचा, विचारांच्या, आशा आकांक्षांचा आविष्कार होत असतो. त्याचे नकार आणि विद्रोह हेही साहित्यातून व्यक्त होतात."(२२) असे वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोशात सांगितले आहे.

१९६० ते १९७० च्या काळातील कादंब-यांबद्दल बाबा भांड लिहितात,"...१९६० ते ७० ह्या दहा वर्षांत कादंबरी लेखनात लक्षणीय प्रयोग झाल्याचे दिसते. त्यातील 'धग' (उध्दव शेळके,१९६०), 'माणूस' (मनोहर तल्हार,१९६३), 'चक्र' (जयवंत दळवी,१९६३), 'इंधन' (हमीद दलवाई,१९६४), 'टारफुला' (शंकर पाटील,१९६४) आणि 'शिदोरी' (व.ह.पिटके,१९६९) या कादंब-यांनी मराठी कादंबरीच्या विकासाची दिशा स्पष्ट करण्यास एकप्रकारे मदतच केली आहे.

ह्या दशकातील कालखंडात कादंबरी-लेखनात प्रमुख तीन प्रवाह आढळून येतात. पहिल्या प्रकारात खांडेकर-फडके-माडखोलकर परंपरेतील कादंब-यांचीच आवर्तने काही कादंबरीकार नव्या नव्या स्वरुपात सादर करीत होते.जुनेच रसायन नव्या लेबलाखाली देण्यात येत होते आणि ह्या कादंब-यांना त्यांचा एक विशिष्ट वाचकवर्ग फार मोठ्या प्रमाणात टिकून होता.दुस-या कादंबरी-लेखन-प्रवाहात ऐतिहासिक,पौराणिक आणि चरित्रपर कादंब-या येतात. इतिहासातील प्रसिध्द पुरुष घेऊन त्याच्या खासगी,वैयक्तिक भावजीवनाच्या संदर्भात, त्याच्या कामप्रेरणांचं कल्पनेनं चित्रण केलं जात होतं. ह्यात त्या त्या कादंबरी लेखकाची दृष्टी,त्या त्या श्रेष्ठ पुरुषांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करीत असते. ह्याही प्रकारातील काही कादंब-यांनी अफाट लोकप्रियता साधली. 'ययाती' (खांडेकर), 'स्वामी' (देसाई), 'आनंदीगोपाळ' (श्री.ज.जोशी), 'झुंज', 'झेप',मंत्रावेगळा' (इनामदार) ही काही त्यांची उदाहरणे बघता येतील.ह्या स्पर्धेत अगोदर निर्देशित केलेल्या चांगल्या लक्षणीय कादंब-या ह्या अमाप स्पर्धेत काही काळ दुर्लक्षित झाल्या.

या कालखंडातील तिस-या प्रवाहातील कादंबरी लेखन मात्र वेगळे आणि लक्षणीय असे आहे. ह्या प्रवाहाने सद्य:परिस्थितीला-वर्तमानाला समर्थपणे सामोरे जाण्याचा प्रयत्न केला. ह्या लेखनात जीवनाच्या विविध स्तरांचे चित्रण करण्याचा प्रयत्न झाला आहे. इथे सामान्य माणसांच्या कथा आल्या आहेत(माणूस),उपेक्षित असे झोपडपट्टीचे जीवन प्रथमच रंगविण्याचा प्रयत्न झाला आहे.(चक्र,माहिमची खाडी) काही ठिकाणी प्रबळ समूह-जीवनाचे आकलन यशस्वीरीत्या मांडण्याचा प्रयत्न हो होता. इतकेच नव्हे, तर एकदम नवा दृष्टिकोन देणारी 'कोसला' सारखी एखादी कादंबरी ह्याच कालखंडात निर्माण झाली.'या विश्वाच्या पसा-यात मानवी जीवनाला काही अर्थ आहे काय? हे प्रश्न कोसला सारख्या साहित्यकलाकृतीने मराठी कादंबरी च्या परंपरेला रा.भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला' च्या लिखाणाने प्रचंड धक्काच दिला. आतापर्यंतच्या मराठी कादंबरीच्या पारंपरिक चौकटी 'कोसला' ने मोडीत काढल्या कथानक निवेदन व संवाद, वातावरण निर्मिती आणि शैली ह्या जुन्या साचेबंद कादंबरी-घटकां 'कोसला'चे हे नवेपण काही काळ पेलवले नाही. भाषाशैली कादंबरीचा घाट-रचना ह्या सर्वबाबतीत 'कोसला' ही एक नवी सुरुवात होती."(२३)

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक जोमदार प्रवाह निर्माण झाला. या दलित साहित्यामुळे मराठी साहित्य अनेक नव्या गोष्टीची भर पडली. कविता, कथा इ. वाङ्मप्रकारांप्रमाणेच दलित कादंबरीने ही याबाबतीत योगदान दिले आहे. दलित कादंबरीबद्दल प्रा. प्रेक्षंजय गोविंदराव लिपटे लिहितात, " 'दलित कादंबरी' ही एका अर्थाने सामाजिक वास्तववादी कादंबरीच होय सामाजिक कादंबरीकार हा जसा तत्कालीन समाजाच्या इतिहासकार असतो तसाच दलित कादंबरीकार ही आपल्या समाजाच्या भूतकाल व वर्तमानकाळाचा साक्षीदार आणि भाष्यकार असतो." (२४) या आधी लिहिल्या गेलेल्या दलित कादंबरी मध्ये काही थोडया प्रमाणात दलित जीवन चित्रण आलेले असले तरी त्यात स्वानुभावाचा स्पर्श नव्हता. कारण हे कादंबरीकार दलितेतर होते. पुढे जाता अनेक दलित लेखकांनी दलित जीवनचित्रण केले. त्याला 'दलित साहित्य' म्हटले

जाते. ज्यात जीवनाचे अस्सल वास्तवपूर्ण आणि विविधांगी चित्रण आलेले आहे. असे दलित लेखक शंकरराव खरात, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, भीमसेन देठे, माधव कोंडविलकर, उत्तम कांबळे, योगेंद्र मेश्राम, नामदेव ढसाळ इ. आहेत.

मराठी कादंबरीत प्रभावी अशा रंजनवादी परंपरेचा स्वाभाविक परिणाम दलित लेखकांवरही झालेला दिसून येतो. दलितेतर लेखकांनी विविध स्तरांतील दलितांचे चित्रण केलेले असले तरी या कादंब-यामधून दलित जीवनाच्या काही मोजक्याच अंगावर प्रकाश पडतो. दलित जीवनाच्या समग्र पैलूंचा विचार केलेला दिसत नाही. दलित लेखकांना दलित जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे दलित कादंबरीत आलेले दलित जीवन चित्रणात दलितांच्या घरादारांचे, वस्तीचे चित्रण, दलितांच्या दु:ख दारिद्र्याचे चित्रण, दलित जातींतर्गत श्रेष्ठकनिष्ठता, विद्रोहाचे प्रकटीकरण, आंबेडकरी विचारांचा आविष्कार इ. विविध पैलूचे चित्रण प्रत्यक्ष ह्या जीवनाचा अनुभव असलेल्या दलित लेखकांनी प्रभावी केलेले आहे. तेथे दलितेतर लेखकांच्या चित्रणातून एवढा प्रभावीपणा पहायला मिळत नाही. या कालखंडपूर्व दलितेतर लेखकांनी केलेले दलितांच्या दु:ख दारिद्र्याचे चित्रणही दलितांच्या वस्तुनिष्ठ जीवनाची कल्पना नसलेले जाणवते. उदा. खांडेकरांची 'दोन मने', वि.वा.हडप यांची 'गोदाराणी' या कादंब-या. दलित लेखकांनी या दु:खाचा, दारिद्र्याचा अनुभव घेतलेला असल्यामुळे त्यांच्या चित्रणाला प्रत्ययकारिता प्राप्त झालेली दिसते. उदा. शंकरराव खरातांच्या 'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबरीत आलेले दलित जीवनातील भीषण दारिद्र्य. दलित कादंबरीमध्ये दलित जातीमध्ये असलेली श्रेष्ठकनिष्ठता, दलितांच्या वाटयाला आलेले अपमान, छळ, अत्याचार, अन्याय, आर्थिक शोषण यांच्या विरूद्धच्या विद्रोहांचे प्रकटीकरण ही दलित लेखकांनी केलेले आहे.दलित कादंबरीमध्ये दलितांच्या कौटुंबिक जीवनाची चित्रणे आलेली आहे तसेच आंबेडकरी विचारांचा अविष्कार ही केलेला दिसतो.

दलित जीवनाचे विविध पैलू चित्रित करताना दलित लेखकांनी प्रत्ययकारी भाषा वापरून, कादंबरीतील वातावरण हे व्यक्तिदर्शन व कथानकातील प्रसंग यांच्याशी एकात्म

स्वरुपात आलेले दिसते. भाषेच्या वापराविषयी प्रचलित रूढ संकेताना दलित साहित्यातील भाषेने धक्के दिले आहे. त्याबद्दल विलास कांबळे लिहितात, "वेगवेगळ्या स्तरात आणि जातिगटात जन्मलेल्या दलित लेखकांनी आपपल्या कादंब-यातून भाषेतून सांस्कृतिक आविष्कार व्यक्त केलेला दिसून येतो. दलित कादंब-यातून भेटणारे स्त्री पुरूष वेगवेगळ्या प्रादेशिक वैशिष्टयांनी समृद्ध असल्यामुळे प्रादेशिक भाषांचे वेगळेपणही दलित कादंबरीतून प्रकटलेले दिसते." (२५) दलित कादंबरी विविध जाती जमातीच्या वैशिष्टयांनी युक्त असल्याने त्यात विविध जाती जमातींचे सांस्कृतिक स्तर व त्यातील परिवर्तनाची प्रक्रिया त्या त्या जातीजमातीच्या विशिष्ट भाषेतील अनेक नव्या म्हणी, अपरिचित शब्द यातून प्रकट होते.

१९६० नंतर दलित लेखकांनी लिहिलेल्या महत्त्वाच्या कादंब-या म्हणजे शंकरराव खरात यांच्या' मी 'मुक्त मी मुक्त' (१९७१), 'पारधी', 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३), बाबूराव बागूल यांची 'सूड' (१९७९), पावश्या, केशव मेश्राम यांच्या 'पोखरण' (१९७२), 'हकिकत' आणि 'जटायू' (१९८०) इ. अनेक कादंब-यांची नावे घ्यावी लागतील.

याच सुमारास खांडेकराची 'ययाति', रणजित देसाई यांची 'स्वामी' श्री.ज.जोशी यांची 'आनंदी गोपाळ' या कादंब-या प्रकाशित झाल्या आणि पौराणिक, ऐतिहासिक चरित्रात्मक कादंब-याचा एक मोठा प्रवाह निर्माण झाला. स्वातंत्र्योत्तर कादंबरीतला हा दुसरा टप्पा परस्पर विरोधी प्रवृत्तीचा एकाचवेळी आविष्कार करणारा ठरला. १९६० नंतरच्या या काळातच मराठी कादंबरी एकाबाजूने भूतकाळाकडे तर दुस-या बाजूने वर्तमानाचा वेध घेताना दिसते. त्यातूनच ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, वास्तववादी अशा अनेक प्रवृत्ती वाढत गेल्या.त्यातून पौराणिक कथेला वर्तमानाचा अर्थ देत, त्यातील व्यक्तिरेखांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न 'ययाति', 'मृत्यूंजय', 'राधेय' सारख्या कादंब-यातून केला गेला. गतकाळात सामोरे जाण्याच्या प्रेरणेतून '१९५७ चा सेनानी', 'स्वामी', 'झेप', 'झुंज' , 'श्रीमान योगी' इ. कादंब-या लिहिल्या गेल्या. वसंत आबाजी

डहाके लिहितात, "महाराष्ट्रातले इतिहासलेखन इंग्रज इतिहासकारांच्या दूषित दृष्टिकोणाच्या विरोधातून सुरु झाले, तर ऐतिहासिक कादंबरीचे लेखन राष्ट्रीय भावनेच्या पोषणासाठी निर्माण झाले. महाराष्ट्रातील राष्ट्रवाद आणि इतिहाससंशोधन व ऐतिहासिक नाटक व कादंबरीलेखन यांचा जवळचा संबंध आहे. रा.भि.गुंजीकर, हरि नारायण आपटे, चिं.वि.वैद्य, सहकारी कृष्ण, नाथमाधव इत्यादि पहिल्या कालखंडातील ऐतिहासिक कादंबरीकार होत. ऐतिहासिक कादंबरीचा दुसरा कालखंड 'स्वामी' (१९६२) या रणजित देसाईंच्या कादंबरीपासून झाला. "( २६ ) 'स्वामी' (१९६२) नंतर ना.सं. इमानदार यांनी 'झेप', 'झुंज', 'राऊ', 'मंत्रावेगळा' इ. पेशवाई काळावरील कादंब-या लिहिल्या, पेशवाईवर लिहिली गेलेली आणखी एक कादंबरी म्हणजे विश्वास पाटील यांची 'पानिपत' ही कादंबरी. पेशवाईवरच्या या कादंब-या व्यक्तिगौरवात्मक असल्या तरी वसंत आबाजी डहाके यांच्या मते, "मानवी जीवनाच्या दु:खगर्भतेचा जो प्रत्यय 'स्वामी' किंवा 'पानिपत' मधून यावा तो येत नाही. याचे कारण या कादंबरीकारांची इतिहासविषयक आणि कादंबरीविषयक समजूत हे आहे. हरी नारायण आपटे यांच्या 'वज्राघात' ची उंची गेल्या अर्धशतकातील ऐतिहासिक कादंब-यांना गाठता आलेली नाही. मनुष्यमनाची गुंतागुंत न्याहाळात असताना लेखकाने राष्ट्रवादी विचारसरणीचे वर्चस्व वागवले नाही: गेल्या अर्धशतकातील ऐतिहासिक कादंबरीकार मात्र नवराष्ट्रवादाचा आग्रह जास्तच प्रबळ ठरलेला दिसतो."(२७) ऐतिहासिक कादंब-या बरोबर पौराणिक कादंब-या ही लिहिल्या जात होत्या. या काळातील पौराणिक कादंब-या म्हणजे आधुनिक भाषेत सांगितलेल्या पुराणकथा 'मृत्यूंजय', 'वैदेही', 'राधेय' इ. कादंब-यातील पुराणकथांचा कालानुसार नवा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न मात्र फारसा त्यात दिसत नाही.

पौराणिक कादंब-या प्रमाणेच चरित्रात्मक कादंबरी हा आणखी एक नवा प्रवाह कादंबरीत सुरू झाला. या प्रवाहात भीमराव कुलकर्णी यांनी 'हरिभाऊ', श्री.ज. जोशी यांनी 'आनंदी गोपाळ' इ. कादंब-या लिहिल्या गेल्या.

या काळातील कादंब-याबद्दल व.दि.कुलकर्णी सांगतात, "१९४५-६० हा कालखंड

प्राधान्याने नवकाव्य आणि नवकथा या वाड.मय प्रकारांचा, तर १९६०-७० हा नवनाट्य आणि नवकादंबरी यांचा. १९४५-६० या कालखंडात कादंबरीत जे काही घडले त्याची परंपरा या कालखंडातील कादंबरील नाही. कारण अशी परंपरा त्या काळातील कादंबरीने निर्माण केली नाही. साहजिकच या दशकात परंपरेतून काही निर्माण करण्याचा किंवा ती परंपरा मोडण्याचा प्रश्न कादंबरीसमोर नव्हता. मागील पिढीचे किंवा परंपरेचे कसलेच आव्हान या कालखंडातील कादंबरी समोर नव्हते." (२८) या काळात नवकादंबरीचे निर्माण झाले नसले तरी ते निर्माण होण्यासाठी आवश्यक अशी भूमिका मात्र झालेली दिसते.

या काळातील ग्रामीण कादंब-यांमध्ये पां.मा. गोरे यांची 'कात टाकलेली नागीन' (१९६१), दि.बा.मोकाशी यांची 'देव चालले' (१९६१), बाबा कदम यांची 'प्रलय' (१९६२), द.ता.भोसले यांची 'इथे फुलांना मरण जन्मता' (१९६५), गो.नी. दांडेकर यांची 'जैत रे जैत' (१९६५), चि.त्र्यं. खानोलकर यांची 'रात्र काळी घागर काळी' (१९६३), 'कोंडुरा' (१९६६), शंकर खंडू पाटील यांची 'सरपंच ' (१९६९) इ. कादंब-यातून ग्रामीण जीवनाचे विविध घटक, त्यांचे स्थित्यंतरही दिसून येते. याच काळात शंकर पाटील यांची 'टारफुला' (१९६४) आणि हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६५) या महत्त्वाच्या कादंब-या लिहिल्या गेल्या. या कादंब-या मधून क्रमशः सरंजामी परंपरा आणि आधुनिक जाणिवा यांच्यातील संघर्ष, जातीजातीमधील तणाव, हिंदु मुस्लिम संघर्ष चित्रित झालेला आहे. या काळातील ग्रामीण कादंब-यांबद्दल नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, 'साधारणतः १९६० नंतरच्या काळात एकूण भारतीय जीवनात अनेकविध स्वरूपाचे बदल होऊ लागले. महानगरांचा अतिशय वेगाने विकास सुरू झाली, जुनी ग्रामव्यवस्था खिळखिळी झोऊन अनेकविध प्रकारचे ताणतणाव जन्माला येऊ लागले. नव्या यंत्रयुगाने खेड्यापाड्यात प्रवेश केला. अनेकविध नव्या सुधारणाही ग्रामीण भागात येऊन पोचल्या आणि या सगळ्यांमुळे ग्रामीण भाग ढवळून निघाला. ग्रामीण भागात निर्माण झालेल्या या अनेकविध प्रश्नांमुळे ग्रामीण भागातून स्थलांतरालाही प्रारंभ झाला.

हे समकालीन ग्रामीण महाराष्ट्राचे वास्तव मराठी कादंबरीने फार कसोशीने प्रकट केले आहे. या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे ठळक वैशिष्ट्य जर कोणते असेल तर ते ती वास्तवाभिमुख झालेली होती हेच आहे. यापूर्वीच्या काळातील ग्रामीण कादंबरी (ग.ल. ठोकळ आणि म. भा. भोसले यांची) स्वप्नरंजनपर आणि तंत्रशरण अशी आहे. या कादंबरीच्या पार्श्वभूमीवर १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचे वेगळेपण चटकन, लक्षात येते ते तिच्या वास्तवाभिमुखतेमुळे. वास्तवाच्या अनुषंगानेच भाषेच्या वापरामध्येही बदल झालेला आहे. एकंदरीत १९६० नंतरच्या काळात आशय आणि अभिव्यक्ति मध्ये बदल झाला यात काही शंका नाही. या बदलाचे स्वरूप मात्र पाहणे आवश्यक आहे.'(२९) याचकाळात गो.नी. दांडेकर यांनी 'बया दार उघड' (१९६६), 'हरहर महादेव' (१९६८), 'दर्याभवानी' (१९६९) इ. ऐतिहासिक ग्रामीण कादंबरी लिहिल्या. व्यंकटेश माडगूळकर यांनी 'वावटळ' (१९६४) ही कादंबरी लिहिली. या काळातील काही कादंब-याची निर्मिती नागरी वाचकांसाठी झालेली जाणवत असली तरी या काळातील अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर, र.वा.दिघे, शंकर पाटील, हमीद दलवाई, व्यंकटेश माडगूळकरांसारख्या लेखकांनी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात मोलाची भर घातलेली आहे. त्याबद्दल जयश्री नाफडे लिहितात, "ह्या कादंबरीकारांनी ग्रामसुधारणा करण्याच्या दष्टिकोनातून कादंब-या लिहिल्या, काहीची निवेदन करण्याची भाषा नागरी व यात्रांची संवादशेली ग्रामीण आहे. असे असले तरी १९६० पासूनच्या काही कादंब-यानी संपूर्ण ग्रामीणत्वालाही महत्त्व दिलेले आहे. १९६० नंतर बदलत गेलेले खेडे, यंत्रसामग्रीचा खेडयातील जीवनावर होणारा परिणा. एवढेच नव्हे तर शिक्षणामुळे उद्‌भवाणा-या विविध समस्या व कामाच्या आशेने शहरात गेलेल्या कामगारांच्या समस्याही ह्या कालखंडातील कादंब-यानी प्रकट केलेल्या आहेत."(३०)

इ.स.१९७० नंतर लिहिल्या गेलेल्या कादंब-याचा विचार करता रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१), आनंद यादव यांची 'गोतावळा' (१९७१), ना.धों.महानोर यांची 'गांधारी' (१९७३), माधव यादव यांची 'बोरगाव' (१९७१) शंकर पाटील यांची 'घुंगरू'

(१९७१),.'बेईमान' (१९७६), गो.नी. दांडेकर यांची 'झुंजारमाची' (१९७२), 'हे ती श्रींची इच्छा' (१९७४). 'मोगरा फुलला' (१९७४) इ. महादेव मोरे यांनी 'बळी' (१९७२), 'वस्ती' (१९७४), 'नटरंग' (१९८०) इ. , चंद्रकुमार नलगे यांनी 'आगीन फूल' (१९७४) इ. बाबा भांड यांनी 'जरंगा' (१९७८), जयवंत दळवी यांची 'धर्मानंद' (१९८०), इ. कादंब-या लिहिल्या गेल्या.

या कालखंडातील कादंब-या पाहता लक्षात येते की त्यामध्ये खेडयागावामध्ये असलेले अज्ञान, दारिद्रय, शोषण इ. मुळे त्रासलेली गरीब भाबडया स्वभावाची व्यक्तिचित्रणे येऊन त्यात सत्तेची लालसा, त्यासाठीचे राजकारण करणा-या माणसांचे ही चित्रण केलेले आहे. त्याबद्दल नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "१९६० ते १९८० या कालखंडात लिहिणा-या लेखकांनी मराठी कादंबरीमध्ये निश्चितच भर घातली आहे. व्यंकटेश माडगूळकर, अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, रा. रं. बोराडे, हमीद दलवाई, आनंद यादव आदी लेखकांनी मराठी कादंबरीविश्वामध्ये मोलाची भर घातली आहेच, पण त्यांनी ग्रामीण कादंबरी लोकप्रियही केली आहे यात काही शंका नाही. सरंजामी परंपरा आणि आधुनिकता, यंत्रयुग आणि ग्रामीण जीवन, जात आणि धर्म यांतील ताणतणाव या आणि यांसारख्या द्वैतांमधूण झडणारा संघर्ष चित्रित करून या कालखंडातील लेखकांनी समकालीन वास्तव साक्षात केले आहे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. "(३१ )

अशा प्रकारे १९७० नंतरची काळातील कादंब-या पाहता लक्षात येते की १९६० च्या आसपास लेखन करणारे र.वा.दिघे ग.ल. ठोकळ, शंकर पाटील, उद्धव शेळके, रणजित देसाई इ. चे लेखन थांबलेले आहे तर गो.नी.दांडेकर, श्री.ना.पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, रा.रं. बोराडे इ. कादंबरीकार तत्कालीन वास्तवात असलेल्या विविध समस्यावर लेखन करून मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह पुढे नेत आहे. इ.स. १९८० नंतरच्या काळात उत्तम बंडू तुपे, रंगनात पठारे, राजन गवस, वासुदेव मुलाटे सारखे नवीन कादंबरीकार ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात जुन्या कादंबरीकारांपेक्षा एक वेगळे अनुभव विश्व प्रकट करत आहे.

या काळात व्यंकटेश माडगूळकर यांची 'करुणाष्टक' (१९८२),गो.नी.दांडेकर यांची 'तुका आकाशाएवढा' (१९८१), 'तांबडफुटी' (१९८२),श्री.ना.पेंडसे यांची 'तुंबाडचे खोत'(१९८७),आनंद यादव यांची 'झोंबी'(१९८७),'नांगरणी' (१९९०),उत्तम बंडु तुपे यांची 'झुलवा' (१९८६),राजन गवस यांची 'चौंडकं' (१९८५), 'भंडारभोग' (१९८८),आनंद पाटील यांची 'कागूद आणि सावली' (१९८६)इ.अनेक कादंब-या लिहिल्या गेल्या आहेत.

या काळातील लेखनाबद्दल वासुदेव मुलाटे लिहितात,"१९८० ते १९९० च्या दशकात ग्रामीण साहित्याची चळवळ जोमात होती. या चळवळीने अनेक नव्या लेखकांना लिहिते केले.परिणामत: ग्रामीण जीवन आणि जाणिवा साहित्यातून मोठ्या प्रमाणात येऊ लागल्या.यात नव्या लेखकांच्या बरोबरीने जुने लेखकही ग्रामीण जीवनातील बदल आपल्या लेखणीने टिपू लागले.ग्रामीण माणसांच्या शोषणमुक्तीसाठी महाराष्ट्रात घडणा-या घटनांचे पडसाद या लेखनातून उमटू लागले.सुरेश जाधव,शिवाजी मरगीळ,पुरुषोत्तम बोरकर,मोहन पाटील,रवींद्र ठाकूर,राजन गवस,अप्पासाहेब खोत,तानाजी राऊ पाटील,प्रकाश होळकर,प्रकाश घोडके,इंद्रजित भालेराव,नारायण सुमंत इत्यादी नव्या लेखक-कवींबरोबरच आनंद यादव,रा.रं.बोराडे,द.ता.भोसले,चंद्रकुमार नलगे,मनोहर तल्हार यांच्या लेखनानेही एक नवीन वळण घेतले. " (३२ )

अशा प्रकारे १९७० नंतरची काळातील कादंब-या पाहता लक्षात येते की १९६० च्या आसपास लेखन करणारे र.वा.दिघे ग.ल. ठोकळ, शंकर पाटील, उद्धव शेळके, रणजित देसाई इ. चे लेखन थांबलेले आहे तर गो.नी.दांडेकर, श्री.ना.पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, रा.रं. बोराडे इ. कादंबरीकार तत्कालीन वास्तवात असलेल्या विविध समस्यावर लेखन करून मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह पुढे नेत आहे. इ.स. १९८० नंतरच्या काळात उत्तम बंडू तुपे, रंगनात पठारे, राजन गवस, वासुदेव मुलाटे सारखे नवीन कादंबरीकार ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात जुन्या कादंबरीकारांपेक्षा एक वेगळे अनुभव विश्व प्रकट करत आहे.

१९७५ नंतर ग्रामीण चळवळीमुळे ग्रामीण साहित्याने एक नवे वळण या काळात घेतले.खेड्याखेड्यातील घरांमधून शिरलेले राजकारण,संयुक्त कुटूंबाचे होत जाणारे विभक्तीकरण आणि त्याचे दुष्परिणाम ही चित्रित होऊ लागले. हे ग्रामीण साहित्यातले चित्रण नवे होते. वासुदेव मुलाटे लिहितात,"त्याचप्रमाणे नव्या पिढीतील बा.ग.केसकर यांची कुणाच्या खांद्यावर,बाबाराव मुसळे यांची हाल्या हाल्या दुदू दे,पुरुषोत्तम बोरकर यांची मेड इन इंडिया ही कादंबरी,चवंडकं-भंडारभोग या राजन गवस यांच्या कादंब-या इ.च्या कादंब-यांतून सहकारी साखर कारखानदारी,खासगी सावकारी,ग्रामपंचायताच्या माध्यमातून निर्माण झालेली नवीन सरंजामशाही आणि अजूनही ग्रामीण भागात चालू असलेल्या अनिष्ट प्रथा यासारखे विषय मराठी साहित्याला नवे होते.ग्रामीण साहित्य भूतकाळातील वर्णनातून केव्हाच मुक्त होऊन वर्तमानातील ग्रामीण वास्तवाकडे वळले आहे. हे सांगणा-या साहित्यकृती आहेत."(३३ )

तसेच नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "धर्म, परंपरा, नियोजन, विकास, राजकारण इत्यादी सर्वच बाबींकडे १९८० नंतरच्या कादंबरीलेखकांनी शोधकपणे पाहिले आणि त्यातून त्यांना ग्रामीणांचे शोषण, घुसमट दिसली, त्यांच्या जीवनातील ताण दिसले. याचा अर्थ असा की व्यवस्था या नावाची गोष्ट कोणाच्या बाजूने उभी राहते याचा शोध घेणे या कालखंडातील लेखकांना अधिक महत्त्वाचे वाटते आहे. ही व्यवस्था ग्रामीणांचे शोषण करते आहे याची त्यांना जाणीव झाली आहे. शहरे, धर्म, परंपरा, राजकारण इत्यादी सर्वच गोष्टी अंतिमत: प्रास्थापितांच्या बाजूने उभ्या राहतात असेच या लेखकांना वाटते आहे, म्हणजे ते आता दु:ख या वास्तवाचे तर चित्रण करतातच, पण त्यापलीकडे जाऊन या दु:खाची पाळेमुळे कुठे आहेत त्याचा शोध घेतात. हा १९८० नंतरच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये झालेला फार मोठा आणि महत्त्वाचा बदल आहे असे म्हणावे लागते. या दृष्टिने आणखी काही कादंब-यांचा विचार करणे आवश्यक ठरते." (३४ )
पुढे ही नागनाथ कोत्तापल्ले लिहितात,"साधारणत: १९८० च्या आसपास मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये आमूलाग्र बदल सुरू झाले. आत्तापर्यंत जे अनुभवविषय चित्रणकक्षेत येतच

नव्हते असे अनुभवविषय कादंबरीमधून प्रकट व्हायला लागले. चित्रणक्षेत्राचा पट अधिकच विस्तृत झाला आणि त्यातून ग्रामीण जीवनाची समग्रता प्रकट होण्याची शक्यता निर्माण झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण भागात जे परिवर्तन सुरू झाले होते ते १९८० च्या आसपास अधिक तीव्र झाले. तणाव अधिकच वाढले आणि ग्रामीण लेखक 'शोधक' झाला. त्याच्या कादंबरीलेखनातून अनेक नवे नवे चित्रण विषय आले, त्या निमित्ताने वास्तवप्रकटनाची व्याप्ती वाढली. पण या कालखंडातील सगळ्यात महत्वाची जर कोणती गोष्ट असेल तर ती ही की, अमुक एक वास्तव आकाराला येण्याचे कारण कोणते याचा शोध लेखक घेऊ लागले. म्हणजे येथे नुसते वास्तव नाही, तर या वास्तवाच्या जडणघडणीमागील कारणे या कालखंडातील लेखकांना महत्त्वाची वाटू लागली. या काराणाच्या अनुषंगाने जीवनवास्तवाचा शोध सुरू झाला. म्हणूनच धर्म, परंपरा, राजकारण, ग्राम आणि शहरे यांचा संबंध हे आणि यांसारखे अनुभवविषय या कालखंडात महत्त्वाचे ठरले. या सगळ्याच गोष्टी नव्या लेखकांनी प्रश्नचिन्हांकित करून टाकल्या. नव्हे, ग्रामीण भागातील सुखदु:खाच्या मुळाशी या गोष्टी आहेत हे लक्षात घेऊनच ते ग्रामीण जीवनाचे चित्रण करू लागले." (३५) ग्रामीण कादंबरीच्या या वाटचालीच्या पार्श्वभूमीवर राजन गवस यांच्या कादंबरी लेखनाचा आपल्याला विचार करावयाचा आहे.

राजन गवस यांच्या चौंडकं, 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या कादंब–या ग्रामीण पातळीवरील जीवनानुभवातून साकार झालेल्या असून या कादंब–यांमध्ये 'चौंडकं' (१९८५) 'भंडारभोग' (१९८८) यामधून धर्म आणि धर्मसंस्था यांच्या मानवी जीवनावर असणारा पगडा, त्यातही ग्रामीण जीवनात त्याद्वारे होणारे शोषण दाखविले आहे तर 'धिंगाणा' (१९९२) 'कळप' (१९९६), 'तणकट' (१९९८) या कादंब–यांमध्ये राजकिय, साहित्यिक क्षेत्रातील राजकारणामुळे तत्कालीन तरूण पिढीची कुंचबणा कशी झालेली आहे तसेच ग्रामीण पातळीवर दलित सवर्ण यांचा संघर्षाला दूर करायला कृषी संस्कृतीत जगणा–या माणसांची मानसिकता, गावगाडयाची रचना समजून एक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे, हे दाखविले आहे.

## ➢ संदर्भ ग्रंथ टीपा


१) देशपांडे कुसुमावती - मराठी कादंबरीचे पहिले शतक - मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई - दुसरी आवृत्ती,१९७५- पृ.१६

२) देशपांडे बाळशंकर - वसंत- १९९६ - पृ.४५

३) डहाके वसंत आबाजी – ललित - दिवाळी अंक २००० - पृ.६९

४) नेमाडे भालचंद्र - टीकास्वयंवर - साकेत प्रकाशन, औरंगाबाद - पहिली आवृत्ती,१९९० - पृ.१९८

५) बांदिवडेकर चंद्रकांत - मराठी कादंबरीचा इतिहास (१९२०-१९४७) - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. - दुसरी आवृत्ती,१९९६- पृ.२४

६) नाफडे जयश्री - साहित्य:ग्रामीण आणि दलित - सं. ईश्वर नंदपुरे-विजय प्रकाशन,नागपुर-पहिली आवृत्ती,२००२-पृ.६६

७) आंबेकर वि.बा. - महाराष्ट्र साहित्य पत्रिका - जाने.मार्च – १९५२ - वर्ष२४ वे अंक - १०० -आजची कादंबरी - पृ.१०

८) कुलकर्णी भीमराव - महाराष्ट्र साहित्य पत्रिका - एप्रिल - मे – जून – १९६३ - वर्ष३६ वे अंक - १४५ -केतकरांच्या कादंब-या - काही विचार - पृ.२६

९) कुलकर्णी भीमराव - पूर्वोक्त- पृ.२९

१०) भागवत दुर्गा - महाराष्ट्र साहित्य पत्रिका - एप्रिल-मे-जून-१९५५ - वर्ष२९वे अंक - ११३ - डॉ.केतकरांच्या कादंब-या - एक परिक्षण - पृ.४३

११) बांदिवडेकर चंद्रकांत - पूर्वोक्त -पृ.७२

१२) नेमाडे भालचंद्र- पूर्वोक्त -पृ.२६७

१३) देवधर विद्या -स्त्री साहित्याचा मागोवा-खंड १ (इ.स. १८५० ते १९५०) – साहित्यप्रेमी भगिनी मंडळ,पुणे-पहिली आवृत्ती,२००२- -पृ.१२६-१२७

१४) नाफडे जयश्री – पूर्वोक्त –पृ.६५

१५) नाफडे जयश्री – पूर्वोक्त –पृ.६६

१६) नाफडे जयश्री – पूर्वोक्त –पृ.६८

१७) फडके भालचंद्र–प्रदक्षिणा – मराठी कादंबरी–कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. – चौथी आवृत्ती,१९६८–पृ.२४१

१८) फडके भालचंद्र– पूर्वोक्त पृ.२४७

१९) कोत्तापल्ले नागनाथ – गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी – सं.विलास खोले–प्रकाशन,लोकवाङ्मय गृह,मुंबई–पहिली आवृत्ती,२००२–पृ.१४९

२०) नेमाडे भालचंद्र – पूर्वोक्त –पृ.२१७

२१) नेमाडे भालचंद्र– पूर्वोक्त –पृ.२२०

२२) संपादक, वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश – पृ.४३

२३) भांड बाबा –कोसलाबद्दल– प्रस्तावना – साकेत प्रकाशन, औरंगाबाद –दुसरी आवृत्ती,१९९६

२४) लिपटे प्रेक्षंजय गोविंदराव – साहित्य:ग्रामीण आणि दलित–सं. ईश्वर नंदपुरे–विजय प्रकाशन,नागपुर–पहिली आवृत्ती,२००२–पृ.२६९

२५) कांबळे विलास – गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी–सं.विलास खोले–लोकवाङ्मय गृह,मुंबई–पहिली आवृत्ती,२००२ – पृ.१५३

२६) डहाके वसंत आबाजी – गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी – सं.विलास खोले – लोकवाङ्मय गृह,मुंबई–पहिली आवृत्ती,२००२–पृ.११५

२७) डहाके वसंत आबाजी – पूर्वोक्त –पृ.११८

२८) कुलकर्णी व.दि.–आलोचना – फेब्रु.१९७१– पृ.४७

२९) कोत्तापल्ले नागनाथ – पूर्वोक्त –पृ.१६१

३०) नाफडे जयश्री – पूर्वोक्त – पृ.७२

३१) मुलाटे वासुदेव-ग्रामीण साहित्य:चिंतन आणि चर्चा-स्वरूप प्रकाशन-पहिली आवृत्ती,२००५-पृ.२३

३२) नागनाथ कोत्तापल्ले- पूर्वोक्त -पृ.१६३

३३) कोत्तापल्ले नागनाथ - पूर्वोक्त -पृ.१६८

३४) कोत्तापल्ले नागनाथ - पूर्वोक्त -पृ.१६४

३५) मुलाटे वासुदेव- पूर्वोक्त -पृ.२९०